अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# सत्याची कसोटी–१.

श्री. वि. दा. ऋषींनी अेवढा स्वार्थत्याग करून, मृतात्म्यांची तरफदारी करण्याकरतां केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर यूरोपांतही हिंडून, अनेक नियत-कालिकांत अेकसारखे लेख लिहून, लोकांची खात्री करण्याचे आटोकाट प्रयत्न चालवले आहेत, तरी समंजस माणसांची खात्री कां पटत नाही ? श्री. ऋषींची गणना कोणीहि शास्त्रज्ञांत करणार नाही हें खरें, तथापि त्यांच्या बाजूच्या अनेक शास्त्रज्ञांचीं नांवें ते सांगतात, आणि तीं सर्वच खोटीं आहेत असेंहि म्हणतां येत नाही. उदाहरणार्थ सर विल्यम क्रूक्स यांनी १८७४ सालीं आपल्या स्वतःच्या प्रयोगशाळेंत अेका मध्यस्थाकरवीं कांहीं प्रयोग करून त्यांची हकीकत प्रसिद्ध केली, आणि आपली खात्री झाल्याचें त्यांनी लिहिलें. या प्रयोगांचे वेळीं त्यांनी अशी व्यवस्था ठेवली होती की निदान त्यांच्या समजुतीने मध्यस्थाला कोणत्याहि प्रकारची लुच्चेगिरी करतां आली नसती, आणि कोणा साथीदाराने त्याला मदत करणेंहि शक्य नव्हतें. अशा स्थितींत मध्यस्थाने जी अेक स्त्रीची आकृति उत्पन्न करून दाखवली, ती त्या मध्यस्थ स्त्रीपेक्षा सुमारें साडेचार अिंच अधिक उंच होती, आकृतीचें नाक, डोळे, वगैरे मध्यस्थ स्त्रीपेक्षा मोठीं होतीं, रंग अधिक गोरा होता, मध्यस्थ स्त्रीच्या नाडीचे ठोके मिनिटाला ९० पडत होते, परंतु या आकृतीच्या नाडीचे ७५ च पडत होते. ' मध्यस्थ स्त्री आणि ही आकृति अशा दोन्ही अेकाच वेळीं मला आणि तेथें असलेल्या आणखी आठ माणसांना दिसत होत्या. हें सर्व माझ्या स्वतःच्या घरांत

घडलें, त्या वेळीं विजेच्या दिव्यांचा झक्क प्रकाश पडलेला होता, आणि तेथें ठेवलेल्या अनेक यंत्रांनी त्या आकृतींचीं छायाचित्रेंहि घेतलीं. 'आपण फसूं नये म्हणून त्यांनी काय काय व्यवस्था केली होती त्याचा तपशील, आणि आपण काय काय अैकलें व पाहिलें याची संपूर्ण हकीकत, त्यांनी अनेक नियत-कालिकांत प्रसिद्ध केली. अितकेंच नव्हे तर यानंतर २८ वर्षांनी त्यांनी 'ब्रिटिश असोसिअेशन' पुढें अध्यक्ष या नात्याने भाषण करतांना सांगितलें कीं, 'मी त्या वेळीं जें लिहिलें त्यांत मला बिलकुल फरक करावासा वाटत नाही.' अितकें झाल्यावरहि शास्त्रज्ञांनी यावर विश्वास ठेवला नाही. असें कां, याचें पुष्कळांस आश्चर्य वाटेल. क्रूक्स हे शास्त्रीय प्रयोगांत अत्यंत काळजीपूर्वक आणि बरोबर अवलोकन करणारे शास्त्रज्ञ होते, शास्त्रज्ञांत त्यांचा दर्जा उच्च होता, आणि त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणालाही शंका नव्हती. मग हें असें कां ? शास्त्रज्ञांनी त्यांच्या म्हणण्यावर त्या वेळींही विश्वास ठेवला नाही, आणि अजूनहि कोणी ठेवीत नाही. याचें अिंगित काय ?

अेवढ्या शास्त्रज्ञाने काळजीपूर्वक केलेल्या प्रयोगांवर जर विश्वास ठेवायचा नाही, तर ठेवायचा तरी कोणावर ? त्यांनी आपल्या समजुतीने फसूं नये म्हणून शक्य तितकी काळजी घेतली होती. यापेक्षा अधिक कोण काय करणार ? नेह-मीच्या प्रयोगांत निसर्गाशीं गांठ असते, आणि निसर्गाचा कोणालाहि फस-वण्याचा उद्देश नसतो, आणि उलटपक्षीं मध्यस्थ हे फसवण्यांत प्रवीण असतात, तो त्यांचा धंदा असतो, त्यांत त्यांनी जन्म घालवलेला असतो, तेव्हा सरळ मनाचा शास्त्रज्ञ त्यांचे डावपेंच ओळखूं शकत नाही, हें अेक त्याचें कारण आम्हीं सांगितलेंच आहे, परंतु तें सोडून विचार केला तर येथे अेक मोठा प्रश्न उपस्थित होतो तो असा की सत्याची कसोटी तरी काय ? विश्वास केव्हां ठेवायचा आणि केव्हां ठेवायचा नाही हें आपण कसें ठरवतों ? या प्रश्नाचा उलगडा झाल्यास कदाचित् अेवढ्या मोठ्या शास्त्रज्ञावर अितर शास्त्रज्ञांनी विश्वास कां ठेवला नाही याचाही उलगडा होण्याचा संभव आहे. त्यांनी प्रयोगाचे वेळीं काय व्यवस्था केली होती, त्यांतूनहि ते फसण्याचा कांही संभव होता कीं काय, हेंही तपासून पाहण्याची

त्यांनी तसदी घेतली नाही. त्यांनी या विलक्षण गोष्टी अैकून अविश्वासाने स्मित करण्यापलीकडे कांहीअेक केलें नाही. अशी अश्रद्धा पाहिली म्हणजे श्री. ऋषींचा आणि त्यांच्या भक्तांचा जळफळाट होतो. पण या अविश्वासाच्या मुळाशी काय आहे हें पाहण्याची तसदी ते घेत नाहीत, किंवा घेण्याची त्यांची अिच्छा नसते, कारण ती घेतल्यास सगळाच डोलारा ढांसळून पडण्याची भीति असते. म्हणजे ते आपला धंदा बुडेल म्हणून मुद्दाम ढोंग करतात असेंहि आम्हाला म्हणायचें नाही, पण विरुद्ध बाजू पाहण्याचा पुष्कळांना धीरच होत नाही, आणि ते कितीहि प्रामाणिक असले तरी क्रुक्ससारखे शास्त्रज्ञ जेथे फसले, तेथे श्री. ऋर्षिसारख्यांची काय कथा ?

या मृतात्म्यांच्या भाकडकथांवर समंजस लोकांचा विश्वास कां बसत नाही, याचें मुख्य कारण म्हणजे त्या सत्याच्या कसोटीला उतरत नाहीत. ही कसोटी काय आहे हें ठरवणें सोपें नाही आणि यावर अनेक तत्वज्ञांनी वेगवेगळीं मतें दिलेलीं आहेत. अमुक गोष्ट खरी कशावरून ? असा प्रश्न विचारल्यास लोक सामान्यतः उत्तर काय देतात, हें तपासून पाहिल्यास त्यांतून ही कसोटी कदाचित् काढतां येअील. यांपैकीं कांही उत्तरें अगदीच फोल असतात, परंतु तींहि पाहण्यांत नुकसान नाही. अशा उत्तरांपैकीं अेक म्हणजे आप्तवाक्य. येथे ‘ आप्त ’ या शब्दाचा अर्थ यथार्थवक्ता असा असतो. यथार्थवक्ता म्हणजे असेल तसें सांगणारा. हें उत्तर अर्थातच फोल आहे, कारण यांत आपण असें धरून चालतों की कोणाला तरी सत्य काय तें माहीत आहे, आणि म्हणून तो खरें बोलल्यास तें सत्य आपल्याला कळतें. ही सत्याची कसोटी होऊंच शकत नाही, कारण त्याला तरी सत्य कसें कळलें, हा प्रश्न शिल्लक राहतो. मनुष्य आपल्या प्रामाणिक समजुतीप्रमाणे खरें बोलूं शकेल, पण त्याचें म्हणणें यथार्थ, म्हणजे वस्तुस्थितीला धरून, असेल असें नाही.

कदाचित् कोणी असेंहि म्हणेल की कांही स्थितप्रज्ञ माणसांना सत्य आपोआप कळतें. त्यांना अंतर्ज्ञान होतें, त्यांना सत्याची कसोटी लावल्या-शिवायच तें कळतें. असें कोणीं म्हटल्यास अशीं माणसें नसतात हें सिद्ध करणें

कठिण आहे, परंतु त्यांना जरी अंतर्ज्ञानानें सत्य कळतें असें धरून चाललें, तरी त्याबद्दल अितरांची खात्री पटणें अशक्य आहे. शिवाय असा स्थितप्रज्ञ मनुष्य अेकच असेल असें नाही, आणि अशीं दोन माणसें परस्परविरुद्ध विधानें करणारीं भेटलीं तर काय करावें ? कोणाचें खरें मानावें ? कित्येक धर्मांत प्रत्यक्ष अीश्वराने कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत असें मानतात, आणि अीश्वर सर्वज्ञ असल्यामुळे त्याला सत्य माहीत असतें असें मानणें भाग आहे. आतां तो खरें बोलेल की नाही ही शंका राहील, पण अीश्वर मानणाऱ्या लोकांना ही शंका येणार नाही. श्रीकृष्णाने धर्मराजाला जरी थापा द्यायला लावलें असलें तरी श्रीकृष्ण स्वतः भगवद्गीतेंत खोटें बोलला आहे असें धार्मिक लोक तरी म्हणणार नाहींत. तेव्हा आप्तवाक्य ही जर कसोटी मानायची असेल तर भगवद्गीतेंत सांगितलेल्या गोष्टी खऱ्या मानाव्या लागतील. त्याचप्रमाणें ख्रिस्ती लोकांच्या अीश्वरानेही कांही गोष्टी सांगितल्या असें ते म्हणतात, त्याही खऱ्या मानल्या पाहिजेत. पण या दोन्ही एकमेकींशीं जुळत नाहीत. तेव्हा सामान्य मनुष्याने यांपैकी कोणत्या खऱ्या मानाव्या ? हिंदूंनी भगवद्गीता आणि ख्रिस्त्यांनी बायबल मानावें असें म्हणतां येअील, परंतु जें सर्वांना मानतां येत नाही तें सत्यच नव्हे. यावरून अमुक मनुष्य म्हणतो म्हणून कोणतीहि गोष्ट सत्य होत नाही. मग तो कितीही विद्वान आणि प्रामाणिक असो. यावरून ' आंतला आवाज, ' ' अंतर्ज्ञान, ' दिव्यदृष्टि, ' वगैरेंची किंमत सत्यान्वेषणाचे कामीं शून्य आहे आणि ही सत्याची कसोटी होऊंच शकत नाही.

यावर कोणीं कदाचित् असें म्हणेल की कोणत्याहि विषयावर लिहितांना त्या विषयांतील विद्वानांचीं मतें आधार म्हणून देण्याची रीत सार्वत्रिक आहे. अर्थात् ज्या विषयांत आपल्याला कांही कळत नाही, त्या विषयांत आपल्याला विद्वानांच्या मतांवर अवलंबून रहावें लागतें हें खरें, पण अमुक मनुष्य तज्ज्ञ आहे अेवढ्यावरच त्याचें मत खरें असें म्हणतां येणार नाही, कारण दुसऱ्या विद्वानाचें मत त्याहून वेगळें असणें शक्य आहे, आणि जो खरा विद्वान असेल तो असें कधींच म्हणणार नाही कीं मी विद्वान म्हणून माझें मत खरें. म्हणजे सत्याची

ही कसोटी तो विद्वानच जर कबूल करीत नाही, तर ती आपल्यालाहि लावतां येत नाही. तो तज्ञ आपलें मत प्रस्थापित करण्याकरतां जीं कांही साधकबाधक प्रमाणें देईल, त्यांचा विचार करूनच आपण सत्य काय तें ठरवलें पाहिजे. तें करण्याचीं ताकत कदाचित् सर्वांना नसेल, तर त्यांना त्या विषयावर आपलें मत बनवतां येणार नाही अितकेंच. पण म्हणून आप्तवाक्य किंवा बाबावाक्य ही सत्याची कसोटी होऊं शकत नाही.

आणखी अेक उदाहरण घेऊं. समजा माझी दाढ दुखत असली, तर ती दुखते आहे याबद्दल मला पुराव्याची गरज नसते. तें सत्य मला प्रत्यक्ष कळतें. अितक्यापुरतें हें खरें आहे, पण हेंही अंतर्ज्ञानासारखेंच आहे, दुसऱ्याला तें खरें मानायला पुरावाच पाहिजे, कारण मी कदाचित् ढोंग करीत असेन. अितकेंच नव्हे तर पुष्कळ लोकांना काल्पनिक गोष्टी देखील प्रत्यक्ष दिसल्यासारख्या वाटतात. उदाहरणार्थ तापांत मनुष्य जें बरळतो तें सर्व खरें नसतें, पण त्याला मात्र खरें वाटते. अेखाद्या दारुड्याला अनेक काल्पनिक प्राणि दिसूं लागतात, पण लोकांना ते दिसत नाहीत. त्याचप्रमाणें कित्येकांना अीश्वर देखील स्वप्नांत दर्शन देतो, पण अितरांना तें खरें कसें वाटावें ?

कोणी म्हणेल की हें अेक राहो, पण पलीकडच्या फांदीवर कावळा बसलेला मला दिसत आहे, आणि तो अितरांना देखील दिसतो. मग येथे तर कसोटीची गरज नाही ? पण यांत थोडी चूक आहे. जी गोष्ट अगदी स्पष्ट दिसतें असें आपल्याला वाटतें, ती पुष्कळ वेळां वाटते तितकी स्पष्ट नसते. उदाहरणार्थ तो कावळा आहे हें आपल्याला कसें कळलें ? आपण पूर्वी कावळा पाहिलेला आहे, त्याचें रंगरूप आपल्याला माहीत आहे, म्हणून तो आपण ओळखला. ज्याला आपल्याअितकी माहिती नसेल असा मनुष्य अखादे वेळीं कोकिळेला देखील कावळा म्हणेल, आणि आपल्याअितक्याच खात्रीने सांगेल की तो कावळाच आहे, पण तो कावळा नसेल. अशी चूक जेथे होण्याचा संभव आहे, तेथे केवळ कोणाच्या तरी मताने अेखादी गोष्ट स्पष्ट दिसते म्हणून ती खरी मानतां येत नाही. त्याला कांहीतरी कसोटीच लावली पाहिजे.

तरमग आणखी अेक उदाहरण घेऊं. दोन आणि दोन चार होतात, हें तर उघड सत्य आहे ? याला तर कसोटीची गरज नाही ? असें कोणी म्हट- ल्यास त्याचा विचार करणें भाग आहे. ही गोष्ट तरी वाटते तशी स्वतःसिद्ध आहे काय ? हें ठरवण्याची अेक सोपी युक्ति आहे. दोन आणि दोन चार होतात असें अेखाद्याने म्हटलें, आणि त्यावर जर दुसरा अेखादा मनुष्य म्हणेल कीं हें खोटें आहे, तर पहिला मनुष्य काय करील ? तो खडे, गोट्या, किंवा अितर कांही वस्तु मांडून त्याचा पुरावा देऊं लागेल. असा पुरावा जर देतां येतो, तर ती गोष्ट स्वतःसिद्ध नव्हे हें उघडच आहे.

यापेक्षाही उघड दिसणारी अशी अेखादी गोष्ट आहे काय ? रसेलने असें म्हटलें आहे की उघडपणा देखील कमजास्त प्रमाणांत असूं शकतो. त्यांनी पुढील उदाहरणें दिलीं आहेत. १. सूर्य वर येत आहे. २. मायलो येथील व्हीनसचा पुतळा दुसऱ्या अमुक पुतळ्यापेक्षा श्रेष्ठ आहे. ३. शून्यापासून कांहीही उत्पन्न होत नाही. ४. क्रूरता वाअीट आहे. ५. कोणतेंही विधान अेकाच वेळीं खरें आणि खोटें असूं शकत नाही. या ५ विधानांसंबंधी आपली खात्री वाढत्या प्रमाणांत आहे असें त्यांचें मत आहे. पहिलें विधान घेतल्यास असें म्हणतां येअील की सूर्य जागयावरच असतो, पृथ्वी फिरल्यामुळे तो वर आल्यासारखा वाटतो. दुसऱ्याबद्दल मतभेद होअील. तिसरें विधान धार्मिक लोक सामान्यतः मानणार नाहीत, कारण, अीश्वराने शून्यापासून जग उत्पन्न केलें आहे अशी कल्पना अनेक धर्मांत आहे. चौथ्या विधानालाहि हिटलरसारखे लोक हरकत घेतील. परंतु पांचवें विधान मात्र सर्वांना कबूल करणें भाग आहे, कारण तो तर्कशास्त्राचा पाया आहे, आणि त्याशिवाय कशापासूनहि कोणतेंहि अनुमान काढतां येणार नाही, आणि आपलें बहुतेक ज्ञान अनुमानांवरच अवलंबून असल्यामुळे हा कायदा कबूल केलाच पाहिजे. मार्क्सवादी लोक तर्कशास्त्रच मानीत नाहीत, परंतु त्यांचा विचार वेगळ्या लेखांत करूं.

तेव्हा हें शेवटचें विधान तर उघड आहे म्हणून कबूल करावें काय? कोणी असेंहि म्हणणें शक्य आहे की आपल्याला या कार्यशिवाय कोणतेंहि अनुमान काढतां येणार नाही, हें कांही त्यावर विश्वास ठेवायला पुरेसें कारण नाही. अेखादें विधान उपयुक्त आहे, म्हणून तें खरें मानावें असें थोडेंच आहे? अीश्वरासंबंधीहि पुष्कळ लोक असें म्हणतात, आणि व्हॉलतेरसारख्याने म्हटलें आहे, की अीश्वर मानण्याचा उपयोग आहे म्हणून तो मानावा. पण अशाने काय अीश्वराचें अस्तित्व सिद्ध होतें? उपयुक्तता हा सत्याचा पुरावा नव्हे. तर मग हें विधान तरी खरें कां मानावें? याचा विचार पुढील लेखांत करूं. (अपूर्ण)

---

# समाधान

लेखक, स. हृदय, महाड.

खोदादाद सर्कलमधील अेंप्रेस महालमधें दादासाहेब कसेबसे शिरले. तपास करीत ते शेवटच्या मजल्यावर आले आणि सुशीला दापोलीकर कोठें राहतात असें त्यांनी तेथील व्हरांड्यांत उभ्या असलेल्या अेका मध्यम वयस्कर स्त्रीस विचारलें. तिने नुसता अंगुलिनिर्देश केला.

तोंच शेजारच्या खोलींतून निघालेलें किंचित्सें हंसे त्यांच्या कानावर आलें. दादासाहेबांनी दारावरची सुंदरशी पाटी वाचली व त्यांनी घंटीचें बटण दाबलें. दार उघडतांच पुढे अेक मोलकरीण उभी राहिली. तिने त्यांना दिवाणखान्यांत बसण्यास विनविलें. थोड्या वेळांतच खुद्द सुशीलाबाअी आकर्षक वेषभूषेत समोर उभ्या राहिल्या. परस्परांचे पहिले आश्चर्याचे कांही क्षण तसेच गेले.

'अिकडे कोणीकडे?' लवकर भानावर येऊन तिने विचारलें.

'आलोंय् तुला भेटायला!'

'अितक्या वर्षांनी आठवण झाली?'

' तुला येथील रिलीफ असोसिअेशनमधें नोकरी लागली. कळलें तूं पोटा-पुरतें मिळवून राहतेस अिकडे. पण बरेच दिवस पत्ता कळला नाही. परवां अेका दापोलीच्या माणसाने तुझा पत्ता पण दिला. आलों होतों कामासाठी मुंबअीस, म्हटलें तुला भेटावें अेकदां. '

' अस्सें ? सभ्याचाराला जागल्याबद्दल आभारी आहें मी आपली. '

सुशीलेने मोहक हालचालींने तेथील बटण दाबलें. त्या बाअीला तिने दोन चहा सांगितले. पुन्हा बराच वेळ शांतता होती. कोणीच कांही बोलूं शकलें नाही. तितक्या अवधींत दादासाहेबांनी तेथील सुबक फर्निचरवर नजर टाकली. सोफे, गोल टेबल, पलीकडे रेडिओ, डोक्यावर सारखा घोंघावत असलेला पंखा, शेजारच्या टेबलावरील टेलिफोन आणि समोर फुलदाणींत सुंदर सुंदर फुलें, वगैरे पाहून ते तर अगदी चकित झाले. सुशिलेला अेक कल्पना सुचली. ' पाह्यचाय् का सबंध ब्लॉक ? ' ' बघूं या. '

सुशिलेने त्यांना आंतील विभूषित खोल्या दाखवल्या. अेका खोलींतील ड्रेसिंग टेबलजवळ जावून तिने जवळील कपाटाचीं दारें उघडलीं, तों त्यांत पन्नासचे वर पातळें दिसलीं दादासाहेबांना. पावडर सेट, नि काय, नि काय, ते बघतच राहिले. शेवटीं सैंपाकघर, बाथरूम वगैरे बघून ते परत बैठकखान्यांत आले. ' किती आहे या जागेचें भाडें ? '

' पंचावन. विजेचा आकार सोडून. '

' तुला पगार किती मिळतो ? '

' मिळतो आपला पोटापुरता. ' पुन्हा शांतता झाली. तिनें घड्याळाकडे पाहिलें. ' बरें तुम्ही उतरलां कोठें ? '

' गिरगांवांत. पण आजचा दिवस तुझ्या येथेंच राहीन म्हणतों. '

सुशीला हंसली. हलकेच श्वास सोडून ती आंत गेली. दोन मिनिटांतच परत आली.

' तूं जरा वाळलीस, नाही का ? '

'पूर्वीचा लठ्ठपणा ठेवून भागेल कसें माझ्यासारखीला ? सडपातळपणांतच सौंदर्य......'

'म्हणजे तूं मुद्दाम होऊन बारीक झालीस ?'

'होय, ना! मला पथ्याचें अन्न खावें लागतें.' अवढें होतें न होतें तोंच तिने दोघांतिघांना फोन केला. 'आज माझ्याकडे पाहुणे आले आहेत, वगैरे' तिने त्यांना वर्दी दिली.

'कोणाला फोन केलास तूं ?'

'दोघेतिघे ओळखीचे गृहस्थ आहेत. त्यांत अेक डाक्तर आहेत.'

'तुझ्या ओळखीचे ? म्हणजे ?'

सुशीला हंसली. दादासाहेब रागावलेले दिसले.

'रागावलां वाटतें. ? पण मला सहा वर्षांपूर्वी टाकून देतांना केला होता का कांही विचार तुम्हीं ? त्या वेळीं तुम्ही माझे पति होतां हें ठीक, पण आतां तीच हुकमत माझ्यावर लादण्यासाठी पुन्हा येथवर आलां आहां ?' ती स्पष्टच बोलली. ते कांही बोलण्याच्या मनःस्थितींत नव्हते. त्यानंतर जेवणें होअीपर्यंतचे त्या माजी पतिपत्नींचे सारे व्यवहार मुक्यामुक्यानेच चालले होते.

सुशीला नेहमीप्रमाणे ठाकठीक बनून पातळ बदलून बैठकखान्यांत आली. 'कशी काय चालतेय् वकिली तुमची ?'

'उत्तम चालतेय्. महिना साडेतीनशें मिळतात सुमारें.'

सुशीला तेथील मसाल्याची सुपारी चघळीत राहिली.

'नि हल्ली मी मोटर पण ठेवली आहे.' शेवटीं तिला तें सांगितल्याशिवाय त्यांना राहवलें नाही.

'बुइक की रोल्स रॉइस ?' हंसतच तिने विचारलें.

'नाही. बेबी ऑस्टिन.'

बराच वेळ अशीं मामुलीच बोलणीं झालीं. मोलकरीण घरीं निघून गेली. शेवटीं झोपेची वेळ झाली म्हणून सुशीला पण आपल्या खोलीत निघून गेली.

दादासाहेबांना अेकट्यांना आपल्या पलंगावर नीट झोप येअीना. ते सुशी-लेच्या खोलीजवळ गेले नि त्यांनी तिचें दार उघडण्याचा यत्न केला. सुशीला बाहेर आली. ' काय पाहिजे ? '

' कांही नाही.' ' झोंप येत नाही वाटतें ? '

' किती सुंदर दिसते आहेस तूं ! ' खुषींत आलेले दादासाहेब उद्गारले. आस्ते आस्ते दादासाहेबांची आक्रमक वृत्ति अनावर होत चालल्याचें दिसत होतें.

' अजूनही मी तुमची पूर्वीची पत्नी आहे नि धर्म धर्म करीत तुमच्या प्राप्तीसाठी कुढत बसलें आहे, असें का वाटतें तुम्हाला ?' सुशीलेनें प्रतिकार केला.

' म्हणजे ? '

' स्पष्टच बोलतें, भीड कशाला हवीय् ? मला भरपूर मोबदला पाहिजे. '

' असेच का पैसे मिळवतेस ? '

' नेमका पगार मिळवणारी नर्स अशी राहते वाटतें ? येथील सामान-सुमानावरून तरी तुमच्यासारख्या हुशार माणसाला सर्व कांहीं समजायला पाहिजे होतें. पण काय हो ? अितक्या वर्षांत तुम्हीं कधी अेक पै तरी पाठवली का ? आपली धर्मपत्नी काय करते, याची कधी माणुसकीला जागून चौकशी केलीत का ? '

' नि म्हणून तूं आपल्याभोंवतीं डॉक्टर्स नि मित्र जमवून ठेवले आहेस !'

' नाहीतर काय करूं ? आपल्या लग्नाच्या मगरमिठीतून माझी सोडव-णूक व्हावी, असा दयार्द्र विचार कधी शिवला होता का आपल्या मनाला ? मला दुसरें लग्न करतां येअीना, म्हणून असें राहणें भाग पडलें मला. त्यासाठीं अशी ही श्रीमंती राहणी नि हा सारा थाटमाट ठेवावा लागतो. '

दादासाहेब संतापलेच होते, पण करणार काय ? सुशीलेपुढून निघून जाण्यांत त्यांना नामुष्की वाटत होती. त्यांच्या पुरुषार्थाला तें लांछन ठरणार होतें. त्यांनी शेवटीं आपल्या खिशांतून नोटा काढल्या. त्यांतल्या कांही त्यांनी

तिच्या अंगावर फेंकल्या. तिने त्या शांतपणें गोळा केल्या, नीट मोजल्या, नि टेबलाच्या खणांत ठेवून दिल्या...................

.................................................................

'झालें तुझें समाधान ?' आरामखुर्चीवर अंग टाकीत ते गुरगुरले.

'माझ्या समाधानाचा प्रश्न नाही. येथे येणाऱ्यांचें कसें होईल हें मला पहावें लागतें.'

'लाज कशी वाटत नाही उघडउघड धंदा मांडलास त्याची ?' ते पुन्हा चिडून उसळले.

सुशीला शांत होती. ती आपली विस्कटलेली केशभूषा नेटकी करीत असतांना जराशी हंसली. 'छे बाई, मला नाही वाटत लाज. पण वाटलीच तर आपल्या पत्नीची कांहीअेक बाजू न अैकतां तिला घरांतून घालवून देणाऱ्यांना वाटायला हवी.' सहज म्हणून पण नेमके वर्मी घाव घालीत होती ती.

'तुझें काय अैकायचें ? प्रत्यक्ष त्या रंग्या कारकुनाने कबूल केलें.'

'मी पण कबूल केलें होतें अगोदर. कांहीअेक आढेवेढे न घेतां.'

'पण माझी अब्रू चव्हाट्यावर मांडली गेली ना तुझ्या दुराचारामुळे ?'

'कबूल करतें मी. तारुण्याच्या उन्मादाने मी धुंद झाल्यामुळे अशा भानगडींत जी कांही गुप्तता राखणें जरूर असतें, ती राखण्याअितकी मी सावध नव्हतें त्या वेळीं. पण तुम्हीं मला अेका शब्दाने विचारलें होतें का, की सर्व कांही ठीक असतां तूं अशी कां वागतेस म्हणून ?'

'पत्नीने पतिव्रताच असलें पाहिजे, तो तिचा धर्म आहे. तिला काय विचारायचें शहाण्या माणसाने ?'

'पण शहाणा माणूस अेकतर्फी निकाल कसा देईल वकीलसाहेब ? आणि फिर्यादी न्यायाधीश कसा होतो ?'

'सांग, मला सांग तुला काय सांगायचें आहे तुझ्या तर्फे तें.' अखेरीस वैतागाने दादासाहेब उद्गारले.

'रागवायचें नाही. अितक्या वर्षांनी कां होअीना? मला आपल्याला स्पष्टच विचारायचा मोह होत आहे. काय हो, आपण पतिपत्नी होतों. माझ्या-पासून आपण सुखी समाधानी होतां की नाहीं?'

'हें काय विचारतेस तूं? तुझ्या सौंदर्यावर मी अितका खुष होतों की तुझ्याबरोबर माझें आयुष्य कंठण्यास मी अेका पायावर राजी होतों. पण तुला अवदसा आठवली.'

'थांबा, असे विचलित होऊं नका. आपण त्या वेळीं कधीं अेका शब्दाने मला विचारायचें होतें, की आपल्या संसारांत तुला सुख लागतें का म्हणून!'

'विचारायची जरूरी?'

'होती, बरोबर होती जरूरी. ती तुम्हीं भागवली नाही, मला काय पाहिजे याची तुम्हाला कदर दिसली नाही, म्हणून मला माझा मार्ग शोधावा लागला. त्यांत रंगोपंत माझ्या कक्षेंत सुलभतेने आले. ठीक जमलें होतें आमचें.'

'त्या रंग्यापेक्षा मी तुला कमी वाटलों काय? तो माझा कारकुंडा!'

'हें पहा, दादासाहेब, तुम्ही वकील असाल नि ते तुमचे कारकून असतील. पण पति म्हणून ते मला योग्य वाटले. नामधारी पतित्वापेक्षा स्त्री पुरुषांतील खरेंखुरें पतित्व नि पत्नीत्व यांच्याशीं सामाजिक दर्जाचा काय संबंध?' सुशीला शांतपणें बोलली.

'हरामखोर नाहीतर! तशा स्थितींत मी काय करायला हवें होतें असें तुला सांगायचंय्?'

'अपशब्द बोलूं नका. मला अेवढेंच सांगायचें होतें की तुम्ही डाक्तराचा सल्ला घेणें जरूर होतें.'

'मग तूं कां बोलली नाहीस आपण होऊन?'

'त्यावेळीं मी तुमची पोटार्थी गुलाम होतें. तुम्हाला दुखवण्याने माझ्या पोटावर पाय येणार होता. त्या वेळीं तुम्ही हक्काने आपला धर्म माझ्यावर लादीत होतां, आणि त्यापुढे मला मान वांकवावी लागे आपखुषीने. त्या वेळीं

मी कशी सांगणार प्रत्यक्षपणें तुम्ही मला विचारल्याशिवाय ? आतां मला आपणांला स्पष्टच सांगायचंय्. हीं सारीं तुमच्या मूर्खपणाचीं फळें आहेत. '

' डाक्तरांचा सल्ला न घेण्याचा मी मूर्खपणा केला आहे म्हणे ! मग काय, माझ्या दुसऱ्या लग्नानंतर मला दोन मुलें झालीं तीं काय डाक्तरच्या सल्ल्याने झालीं ? '

' मुलें होण्याचा पत्नीच्या समाधानाशीं काय संबंध ? '

' तिला समाधान वाटल्याशिवाय का मुलें झालीं ? तूंच अेक जगावेगळो निघालीस. '

' थांबा, तिला खरोखरच काय वाटतें हें तिला विचारल्याशिवाय तुम्ही माझ्याशीं बोलत आहां. तुमच्या या थापा सोडल्या तर तिला बिचारीला काय वाटतें तें तिचें तिलाच कळे. '

' पण मी सांगतों की तिला समाधान खास वाटत असलेंच पाहिजे, ती सुखांत आहे. नि......'

' पण मी सांगतें माझ्या आतांच्या अनुभवावरून, अितक्या वर्षांत जरा सुद्धां फरक पडला नाही तुमच्यांत. '

' म्हणे फरक पडला नाही. दोन मुलें झालीं मला ! '

' तीं तुमचींच असल्याचें तुमचें समाधान मी हिरावूं अिच्छित नाहीं. '

' म्हणजे ? ' दादासाहेब ताडकन् उठले व चवताळून सुशीलेच्या अंगावर धांवून गेले. ती जरा दूर झाली.

' शांत व्हा. तें तुम्ही आपल्या सालस पत्नीला विचारा. मला काय विचारतां ? कदाचित् ती माझ्यापेक्षा चतुर नि धूर्त असूं शकेल. '

रागाने चळचळ कांपत दादासाहेब त्या खोलीच्या बाहेर आले, कसेबसे अंगावर कपडे चढवले, पायांत बूटही ठांसला. अेखाद्या कुशल परिचारिकेप्रमाणें सुशीलेने त्यांच्यासाठी बाहेरचा दरवाजा उघडला. दादासाहेब बाहेर पडले. दरवाजा बंद झाल्याचें खटकूणें त्यांनी अैकलें.

---

# हस्तमैथुन हानिकारक आहे काय ?—१

लेखक, अेक डॉक्टर

हस्तमैथुन या नावावरून हा एक मैथुनाचा प्रकार आहे अशी साहजिक कल्पना होते, पण वस्तुतः मैथुन ही क्रिया दोन व्यक्ति मिळून होत असते आणि हस्तमैथुन हें बहुशः अेकच व्यक्ति करते. तथापि हस्तमैथुन हा अेक मैथुनाचा विकल्प प्रकार आहे असें समजायला प्रत्यवाय नाहीं.

## हस्तमैथुन कोण करतो ?

वानर आणि नर जातींत हा विकल्प प्रकार विशेषेंकरून दिसतो. पुरुषां-अितकाच स्त्रियांतही हा प्रकार प्रचलित आहे. मनुष्य जितका जास्त सुधारलेला, तितका हस्तमैथुनाचा प्रघात जास्त. रानटी लोकांत, किंवा माकडांतही, जेथे समागमाला निर्बंध नाही तेथे हस्तमैथुन हा प्रकार जास्त दुर्मिळ. दुधाची तहान उगाच ताकावर कोण भागवील ? माणसाने पाळलेल्या माकडांना बहुधा त्यांच्या अितर मंडळीपासून वेगळें रहावें लागत असल्यामुळेच त्यांना आपली लैंगिक भूक भागविण्यास दुसरा मार्ग नसतो. मनुष्यांतही अनेक प्रचलित नियमांमुळे तरुणांना व तरुणींना आपली नवीन उत्पन्न झालेली भूक भागवायला कांही सोय दिसत नाही. अशीं अगतिक तरुणतरुणी या मार्गांत पडतात.

वयांत आलेली तरुण मंडळीं, जिज्ञासेने म्हणा किंवा नवीन उत्पन्न झालेली भूक भागवण्यासाठी म्हणा, निरनिराळ्या तीन मार्गांत वळतात. १. चोरून समागम, २. हस्तमैथुन, ३. समसंभोग. पैकीं कोणत्या तरी मार्गाने आपली भूक भागवण्याची खटपट स्त्रीपुरुष वयांत आल्यावर करीत असतात. वरील तिन्ही प्रकार स्त्रियांस व पुरुषांस सारखेच लागू आहेत. पहिल्या प्रकाराबद्दल वादच नाही. दुसरा प्रकार स्त्रियांत चालू असेल याचें कित्येकांस आश्चर्य वाटेल. समसंभोग स्त्रियांत व पुरुषांतही सारखाच सांपडतो. विशेषतः स्त्रियांनी चालवलेल्या संस्थांत, हॉस्पिटल नर्सेस वगैरेंत व ज्यांना पुरुषजातीची

चीड आलेली असते अशा स्त्रियांत, समसंभोग बराच बोकाळला आहे. या स्त्रिया बऱ्याच पुरुषी वळणावर जातात. विश्वविद्यालयाच्या होस्टेलमधें राहणारे विद्यार्थी व बऱ्याच दिवसांच्या कैदेंत पडलेले पुरुष यांचा स्त्रियांशीं संबंध कधीच येत नाही. अशी मंडळी आपआपसांत समसंभोगाचा आश्रय घेतात. थोडक्यांत काय, 'स वै मुक्तोऽथवा पशुः' असे अपवाद सोडले तर बाकीचे झाडून सारे लोक वरील तीन प्रकारांत मोडतात. चोरून समागम म्हणजे अेकमेकांच्या संमतीने होणारा पण बाकी बेकायदा प्रकार होय. या खटपटींत पडणारे पुरुष शेंकडा १०–१२ च, पण हे चांगले वस्ताद, बहुधा आपल्या चैनीपुढे दुसऱ्याचें कांही कां होईना असा विचार करणारे लोक असतात. यांच्या जाळ्यांत सांपडणाऱ्या स्त्रिया व मुली भोळ्या बापड्या, भुलथापांनी सहज बनणाऱ्या असतात. पुढेंमागें कपाळाला हात मारण्याची वेळ याच स्त्रियांना येते, व हे पुरुष मात्र नामानिराळे राहतात. वेळ आली तर तिलाच बदफैली म्हणतील व आपण त्या गांवचेही नाही असें दाखवतील. अेवढी बेजबाबदारी चांगली नव्हे. चोरून समागमाचे परिणाम टाळण्याची खबरदारी घेतल्यास दोघांना सोयीचा व भूक थांबवण्याचा हा अेक मार्ग होय.

दुसरा मार्ग हस्तमैथुन. या प्रकाराने तात्पुरती भूक तर भागते, व दुसऱ्याच्या खुशीवर अवलंबून रहावें लागत नाही, हा दुसरा फायदा. हें गाडें स्वनियंत्रित असल्यामुळे कधी कधी अतिशय भरधांव जातें, खांचखळगे, धोके दिसत नाहीत, असें असल्यामुळे अनेक वेळां अती तेथे माती होण्याची वेळ येते. हस्तमैथुनाच्या अतिरेकाने थोडे फार नुकसान आहे यांत शंका नाही, पण क्वचित् प्रसंगीं नाअिलाज म्हणून हस्तमैथुन केल्यास तें नुकसानकारक तर नाहीच, पण प्रकृतीस चांगलेंच आहे. माफक प्रमाणांत हस्तमैथुन केल्यास आपली भूक भागवण्याचा सन्मान्य असा दुसऱ्या प्रतीचा हस्तमैथुन हा मार्ग होय.

तिसरा मार्ग समसंभोग. स्त्रियांत याचे दुष्परिणाम फारसे दिसत नाहीत, पण पुरुषांत या समसंभोगाचे दुष्परिणाम फार दूरवर पोहोंचतात. अतअेव हा मार्ग त्याज्य होय. समसंभोग हा कायद्याने शिक्षापात्र गुन्हा ठरलेला आहे.

## स्वसंभोगाचा फैलाव

अनादिकालापासून हस्तमैथुन प्रचारांत आहे. हस्तमैथुनालाच स्वसंभोगही म्हणतात. स्त्रियांपेक्षा पुरुषांत कळत नकळत कधींच स्वसंभोग केला नाही असा मनुष्य विरळा. शंभरांतील नव्याण्णव लोक केव्हां ना केव्हां तरी आपण हस्तमैथुन केल्याचें कबूल करतील, आणि कबूल न करणारा शंभरावा खोटें बोलतो असें समजावें.

स्वसंभोग हा मैथुनाभावीं उपयोगांत आणला जाणारा अेक प्रकार आहे. मैथुनाभावीं लैंगिक भूक भागवण्याचा निःसंशय सर्वांत जास्त फैलावलेला असा स्वसंभोग हा मार्ग आहे. जगाच्या पाठीवर अशी अेकही मनुष्यजात नाही, राष्ट्र नाही की समाज नाही, की जो या संवयीला बळी पडलेला नाही. हस्तमैथुन हें जगाच्या सुरवातीपासून असावें असें दिसतें, आणि सुधारणेबरोबर त्याचा फैलावही झपाट्याने होत आहे. बालवयापासून मरेपर्यंत व समाजाच्या सर्व पातळींत फैलाव असणारा हा अेक अजब प्रकार आहे. मनुष्यप्राण्यांपेक्षा जनावरांत प्रचार कमी. कुत्र्यामांजरांतही स्वसंभोगाचीं उदाहरणें फेरे यांनी दिलीं आहेत. प्राणिसंग्रहालयांत माकडांचे चाळे सर्वांनी पाहिलेच असतील. हा प्रकार पक्ष्यांतही आहे. हस्तमैथुनाची गुप्तता राखणें फार सोपें असल्यामुळे त्याचा प्रत्यक्ष फैलाव किती आहे हें सांगणें कठिण आहे.

अमुक मनुष्य स्वसंभोग करतो असें ओळखण्याची अेकही निश्चित खूण मनुष्याच्या अंगावर, तोंडावर किंवा कोठेही नाही. धार्मिक उपदेशक आणि लोकप्रिय गप्पाडे लोक या विषयावर लांबच लांब व्याख्यानें देतात आणि सांगत सुटतात की स्वसंभोग करणाऱ्या मनुष्याच्या अंगावर, तोंडावर, त्याच्या गुप्त संबंधीच्या खुणा स्पष्ट दिसतात. पण या गोष्टी त्यांना बिचाऱ्यांना घाबरवण्यासाठी उत्पन्न केलेल्या गप्पा होत. ज्या सन्मान्य स्त्रीपुरुषांबद्दल तुम्हाला स्वप्नांतही शंका वाटणार नाही, अशी मंडळीही स्वसंभोग करतात. सुप्रसिद्ध लोक, श्रीमंत, गरीब आणि गुन्हेगार लोकही याच पंथांत सांपडतात. कांही

सुप्रसिद्ध वा कुप्रसिद्ध लोकांच्याही स्पष्ट कबुल्या असेंच दर्शवतात. रूसो नामक सुप्रसिद्ध लेखक व राजकारणी गृहस्थ या संवयीचा भोक्ता होता. तरुण वयांत गटे हा प्रसिद्ध लेखक स्वसंभोग करीत असे. गोमोल, व्हॉल्तेर, हे तर तरुण वयांत आणि म्हातारपणींही स्वसंभोग करीत. केर्कगार्ड नांवाचा सुप्रसिद्ध जर्मनही याच रांगेंत होता. महात्मा गांधींचें चरित्र प्रसिद्धच आहे.

स्वसंभोग हा अेकच प्रकार असा आहे की त्यासाठी जोडीदारावर अवलंबून रहावें लागत नाही. स्वसंभोग अेकांतप्रिय असल्यामुळेच अिहलोकींच्या सुखाला लाथ मारून आजन्मब्रह्मचारी म्हणून खोटेंच मिरवतां येतें. असे वाहते ब्रह्मचारी, संन्यासी आणि युरपमधले धर्मोपदेशक वगैरे लोक स्वसंभोगाने आपली दुधाची तहान ताकावर भागवतात. स्वसंभोग स्त्रियांत जास्त की पुरुषांत जास्त, याबद्दल मतभेद आहेत. लैंगिक ज्ञानाबद्दल जसें लोकमत बरेंचसें चुकीचें असतें, तसेंच येथेही आहे. लोकांची अशी समजूत दिसते की हा दुर्गुण फक्त पुरुषांना लागू आहे. डेव्हिसने स्त्रियांकरतां अेक प्रश्नपत्रिका तयार केली होती ( १९२९ ). ती ११८२ स्त्रियांनी भरली, पैकी ७२१ स्त्रियांनी आपली स्वसंभोगाची संवय कबूल केली. लर्झफेल्डच्या मतें ( १९३४ ) स्त्रियांत स्वसंभोग पुरुषांपेक्षा कमी नाही, प्रकारांत फरक असतील. आपण स्वसंभोग करीत नाही असें प्रामाणिकपणें सांगणाऱ्या स्त्रिया सुद्धां अशा समजुतींत असतात की स्वतःच्या बोटांचा उपयोग केला तरच तो स्वसंभोग.

## हानिकारक स्वसंभोग

आपणांस बऱ्यावाअीट संवयी लावणें किंवा मानसिक धडे घेणें हें आपल्या तारुण्यकाळांत आपण कळत नकळत करीत असतों, व या सर्वांचा बरावाअीट परिणाम आपल्या पुढील सर्व आयुष्यभर आपणांस मिळतो. स्वसंभोग ही संवय अेकांतिक असल्यामुळेच अेकदां संवय लागली की ती सुटणें कठिण असें बऱ्याच लोकांच्या अनुभवास येतें. ही अेकांतिक संवय भलत्या प्रमाणांत वाढणेंही अतिशय सोपें असल्यामुळे आटोक्यांत न रहाणारें हें व्यसन निंद्य

व त्याज्यच समजलें पाहिजे. हा नियम स्त्रीपुरुषांस सारखाच लागू आहे. स्वसंभोगापासून होणारें नुकसान अंशतः शारीरिक व अंशतः मानासिक असतें. शारीरिक नुकसानापेक्षा मानासिक नुकसान दसपट असतें. भोंदू तज्ञ लोकांनी वर्णिलेले अेकअेक भयंकर परिणाम वाचून बिचारा वाचक अेकदम भांबावून जातो आणि आपल्या पापाची भयंकर फळें आपणांस भोगावीं लागणार म्हणून गरीब बिचारा तरुण मनुष्य खचून जातो. या परिस्थितीमुळे असें अेक महत्वाचें तत्व लक्षांत ठेवणें जरूर आहे की काल्पनिक रोगांची भीति प्रत्यक्ष शारीरिक व्याधींअितकीच नुकसानकारक असते. म्हणजे जितकी भीति जास्त धरावी तितका प्रत्यक्ष त्रास जास्त. स्वसंभोगाची दुष्ट संवय जडूं नये म्हणून, जडली असल्यास सुटावी म्हणून, सदिच्छेने केल्या गेलेल्या आजपर्यंतच्या भडक वर्णनांनी स्वसंभोगाच्या संवयीने होणाऱ्या नुकसानापेक्षा दसपट नुकसान होतें.

या अेकांतिक संवयीने निःसंशय अेकअेक रोग होतात, वेड लागतें, आयुष्य घटतें, तोंडावर अंगावर पुळ्या उठतात, फोड उठतात, अशा मनुष्याचें चित्त स्थिर नसतें, डोळे ओढलेले, झोपाळू, डोळ्यांभोवतीं काळीं चक्रें, वगैरे सर्व वर्णनें या भोंदू तज्ञांनी तरुणांना घाबरवून ही संवय मोडण्यासाठी उत्पन्न केलेलीं कपोलकल्पित, निराधार अशीं विधानें होत, हें प्रत्येक तरुणाने निःसंशय समजावें. व्हॉल्तेर, हिपोक्रेटिस, सारख्यांनी अशींच विधानें ठांसून केल्यामुळे पुढेंपुढें शहाणे म्हणवणारे डॉक्टर लोकही तसेंच म्हणूं लागले व गरीब बिचाऱ्या तरुणांची सहज दिशाभूल होऊन ते जास्तच घाबरूं लागले.

आपल्या अिकडेही पुरातन वाङ्मय भरपूर आहे व आधुनिक तज्ञ लोक पण त्याच भयंकर ज्ञानाची री ओढीत आहेत, व होतकरू तरुणांना निरुत्साह करून त्यांचें आयुष्य कठिण करीत आहेत. अनेक तरुणांनी याच कारणाने आपल्या आयुष्याचें मातेरें करून घेतलें व कित्येकांनीं जीव दिले. या सर्वांला कारण कोण ? स्टेकेल, फ्रॉइडसारख्या तज्ञांचीं मतें व त्यांचे अनुभव गुंडाळून ठेवून आजकालचे तज्ञ म्हणवणारे लोकही चुकीचीं, मूर्खपणाचीं व घातकारक विधानें

आपापल्या ग्रंथांतून करीत आहेत. मुलांना व तरुणांना विनाकारण घाबरवून सोडणें हा त्यांना सुधारण्याचा मार्ग नसून घातकारक मार्ग होय. चुकीचीं घातक विधानें असलेला लेख वाचणारा स्वसंभोगक अेकंदर अनर्थपरंपरा वाचून शेजारची विहीर किंवा नदी जवळ करून आपल्या दुःखाचा शेवट करून घेअील यांत नवल काय ? आत्मघाताच्या कारणांत अनेक वेळां हीं भयंकर पुस्तकेंच ( उ ' ब्रम्हचर्य हेंच जीवन, ' लेखक स्वामी शिवानंद ) मुळाशीं असलेलीं बरेच वेळीं दिसतील.

कोणी स्वसंभोग करूं नये म्हणून, किंवा करीत असल्यास सोडावा या उद्देशाने, अेकअेक काल्पनिक अनर्थपरंपरा वर्णन करणें आतां तरी आधुनिक तज्ञ म्हणवणारांनीं बंद करावें. लैंगिक भूक दाबून टाकण्याचे हे पूर्वीचे उपाय शेवटीं अनर्थ उत्पन्न करतात. उलट स्वसंभोगाचे परिणाम असतील त्यापेक्षा दोनचार कमी लिहिले तरी नुकसान न होतां तरुणांना थोडा उत्साह जास्त येअील व विनाकारण दुष्परिणाम होण्याचें तरी टळेल. शंभर वर्षांपूर्वी जॉन हंटरने असा पहिलाच प्रयत्न केला. या तज्ञाने तर स्वसंभोगापासून कोणत्याही प्रकारची हानि होत नाही असेंच प्रतिपादन केलें आणि अद्यावत् लैंगिक तज्ञ तर असें ठांसून सांगतात की प्रत्यक्ष मैथुनापेक्षां स्वसंभोग जास्त हानिकारक खास नाही. अेकेल तर म्हणतो की स्वसंभोगाची संवय असल्याने कोणत्याही प्रकारचें नुकसान होत नाही.

अर्थात् या तज्ञांनी मानसिक विकारांचा येथे विचारच केलेला नाही. त्याचें प्रतिपादन अितकेंच की प्रत्यक्ष शारीरिक हानि होत नाही. या तज्ञांचीं मतें लक्षांत घेतांना अेक गोष्ट मात्र विसरून चालणार नाही की त्यांचीं हीं मतें फक्त माफक प्रमाणांत असलेल्या स्वसंभोगाबद्दल आहेत. अतिरेकाचीं कारणें व परिणाम आपण पुढें पाहूं. प्रत्यक्ष मैथुन व स्वसंभोग यांत फारसा फरक नाही हें जरी खरें आहे, तरी मैथुनाचा अतिरेक कितीही झाला तरी स्वसंभोगाचा अतिरेक हा अनेक पटींनी जास्त होअूं शकतो. तेव्हां अतिरेकाचे परिणाम केव्हांही जास्तच होतील.

स्वसंभोगाच्या संवयीबरोबर जी अेकांतिक संवय लागते तींमुळेच जास्त दुष्परिणाम होतात. अेकांताच्या आवडीबरोबर मनुष्याला मानसिक अेकांताची चटक लागते. तो अेकलकोंडा बनतो. या दोन कारणांनीं अेकसमयावच्छेदें-करून हानि होण्याचा संभव असतो. अेकलकोंडेपणामुळें तें मनुष्य माणूसघाणें बनतें. येथून आत्मविश्लेषण सुरू होतें. तारुण्याच्या पहिल्या दिवसांत या अंतर्मुखीपणाचे भलते परिणाम होण्याचा संभव असतो. मुलींत तर हा अंतर्मुखी-पणा फार पुढें जाऊन संभोगसुख नकोसें वाटूं लागतें व विवाहच नको असें त्या म्हणूं लागतात.

## स्वसंभोग म्हणजे काय ?

प्रथम ज्या प्रकारची चेतना उत्पन्न झाली असेल त्याप्रमाणे भिन्नभिन्न लोकांत कमीजास्त प्रमाणांत हातांचाच उपयोग केला जातो. साहाजिकच अतिप-रिचयाने पुढेंपुढें चेतना कमी होऊं लागते. नंतर बनलेला, म्हणजे स्वसंभोगाच्या मगरामिठींत सांपडलेला, तरुण चेतना उत्पन्न करण्यासाठी दुसरे मार्ग शोधूं लागतो. कांहीं लोक तर मनांत कल्पना आल्याबरोबर चांगले उत्तेजित होतात. संभोग-समयीं पुरुष जशा हालचाली करतो, तद्वत् हालचाली करून हे लोक रेतस्खलन करतात, आणि हा प्रकार हाताने करीत नसल्यामुळे आपण हस्तमैथुन करीत नाहीं असें सांगूं शकतात. वस्तुतः तादृश फरक तो काय ?

स्त्रियांत व मुलींत हस्तमैथुनाचे प्रकार वेगळे असतात. आपल्या मध्यें-द्रियाला हातांनी खेळवण्यास स्त्रिया फारशा तयार नसतात. शिवाय अनेक अितर मार्गांनी स्त्रियांना चेतना जास्त होते. ( मेकॅनिकल मीन्स ). याच कारणाने स्त्रियांत अनेक भिन्न प्रकार दिसतात. कांहींना बाह्यप्रदेशालाच चेतना पुरेशी वाटते, कांहींना मदनध्वजाच्या घर्षणाने चेतना होते. बाकीच्या विवाहिता किंवा वेश्या योनिमार्गाच्या घर्षणाने चेतना करून घेतात. अितर बऱ्याच स्त्रिया प्रत्यक्ष योनिमार्गापर्यंत न जातां मूत्रमार्गाच्या घर्षणाने उत्पन्न झालेल्या चेतनेने संतुष्ट असतात. साधारणपणें सुरवात बाह्यप्रदेशांत होऊन हळूहळू योनिमार्गाच्या

घर्षणापर्यंत संवय वाढत जाते. अनेक भिन्न पदार्थ चेतना उत्पन्न करण्यासाठी वापरले जातात. मेणबत्त्या, लहान बाटल्या, केळीं, कपड्यांच्या खुंट्या, सळया, पेन्सिली, चाव्या, केंसांतील आंकडे, वगैरे अनेक पदार्थ वापरण्यांत येतात असें दिसतें. काल्पनिक लैंगिक रोगांकरतां मिळणारीं विजेचीं उपकरणेंही स्वसंभोगासाठीं स्त्रिया वापरतात.

असल्या भलभलत्या वस्तु वापरल्याने भयंकर प्राणघातक परिणाम होण्याचा संभव असतो. लांकडी किंवा धातूची कोणतीही वस्तु मूत्रमार्गांत किंवा योनिमार्गांत घालणें म्हणजे अतिशय भयंकर विघातक गोष्ट होय, हें नक्की ध्यानांत ठेवावें. योनिमार्गाच्या किंवा मूत्रमार्गाच्या बाजूच्या नाजूक भिंतींना अिजा होण्याची भीति असते. स्त्रियांच्या मूत्राशयांत शस्त्रवैद्यांस सांपडणाऱ्या विविध वस्तु स्वसंभोगाखेरीज अितर कोणत्या कारणाने तेथे जाणें शक्य आहे ?

## स्वसंभोगाचीं कारणें.

स्त्रिया, पुरुष व मुलें यांना ही संवय कशी जडते ? ती काय नैसर्गिक संवय आहे ? नाही, पण चेतक कारणें जिकडेतिकडे आपल्या भोंवतीं अेवढीं आहेत, की सुखसंवेदना उत्पन्न करणाऱ्या गोष्टी मनुष्य सहज गमतीखातर पुन्हा करतो, व अशा तऱ्हेने संवय होते. तज्ज्ञ लोकांच्या मतें बहुतेक सर्व पुरुष आपल्या आयुष्यांत लहानपणीं नाही तर मोठेपणीं तरी केव्हांतरी स्वसंभोग करीलच. मुलींची गोष्ट निराळी पडते. हल्लींच्या सुधारलेल्या स्त्रियांच्या काळांतही ही संवय त्यांना तितक्याच प्रमाणांत लागत नाही. पण विवाहाचें वय जसजसें वाढत चाललें आणि तरुण मुलेंमुली अेकमेकांत जास्त मिसळूं लागलीं, तसतशी ही संवय वाढत आहे. शिवाय या संघट्टनामुळे तरुण मंडळींत जास्त घोटाळे माजूं लागत आहेत ते निराळे. ( अपूर्ण )

---

# ग्रंथपरीक्षण

**१. शीलसंवर्धन.** लेखक व प्रकाशक, डॉ. केशव भास्कर लेले, एम्. सी. पी. एस्., ३८९ सदाशिव पेठ, पुणें–२. पृष्ठें ४८, किंमत ४ आणे.

हें पुस्तक एडमंड शाफ्ट्सबरी यांच्या 'हंड्रेड् पॉइंट्स् ऑफ कॅरॅक्टर्' या पुस्तकावरून लिहिलेलें आहे असें लेखकानें सांगितलें आहे, आणि तें पालकांनी विकत घेऊन आपल्या मुलांना शिकवावें असेंहि मत प्रदर्शिलें आहे. या पुस्तकांत लेखकानें स्वतःचा मालमसाला बराच घातला आहे, तेव्हां यांतील कोणत्या मजकुराबद्दल मूळ ग्रंथकार जबाबदार आहे हें कित्येक वेळां समजत नाही. अशा स्थितींत जबाबदारी वांटून न देतां सरसकट सर्व मजकुराचा विचार करणें भाग आहे. या मजकुरांत मूर्खपणा आणि वेडगळपणा जागोजाग पसरलेला सांपडतो, आणि कित्येक ठिकाणीं या लेखकाला वेड लागलें आहे की काय अशी जबरदस्त शंका येऊनच रहात नाही, तर जवळजवळ खात्री होते. पुस्तक जरी लहान आहे, तरी त्यावर सविस्तर टीका करणें झाल्यास त्याच्या दसपट लांबीचा ग्रंथ लिहावा लागेल, तेव्हां येथे फक्त कांही मुद्देच सांगतां येतील. 'विषयप्रवेश' या पहिल्याच प्रकरणांत शीलसंवर्धनाच्या चार बाजू सांगितल्या आहेतः—१. शरीराचें आरोग्य; २. मानासिक सद्गुण; ३. सामाजिक नीति; आणि ४. ईश्वराविषयक प्रेम अथवा दृढविश्वास. शीलसंवर्धनाच्या या शेवटच्या अंगावरून हें पुस्तक अेखाद्या धार्मिक वेड्यानें लिहिलें असलें पाहिजे हें उघड दिसतें, आणि त्याबरोबरच हेंही सिद्ध होतें की लेखकाला निरीक्षणाची संवय नाही, फक्त डोळे मिटून डोक्यांत येतील ते विचार लिहिण्याची संवय आहे. आस्तिकांचें शील नास्तिकांपेक्षा चांगलें असतें, असें कोणीही सत्याची चाड असलेला मनुष्य म्हणणार नाही, कारण तसा अनुभव जगांत येत नाही. अर्थात् ओश्वरावर विश्वास असणें यालाच नीति म्हटल्यास नास्तिक मनुष्य व्याख्येनेच अनीतिमान ठरेल, एरवीं तो अनीतिमान नसतो. आपल्याकडे आंकडे गोळा करण्याची फारशी

पद्धत नाही, तेव्हां या बाबतींत अमेरिकन आंकडे पाहूं. लेखकानेही अमेरिकन पुस्तकाचाच अनुवाद केला आहे, तेव्हां त्याला यांत कांही गैर दिसणार नाही. पुढील माहिती 'अमेरिकन मेडिसिन' नांवाच्या मासिकांत प्रसिद्ध झाली आहे. "तुरुंगांतील कैद्यांसंबंधी अलीकडे मिळवलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं कैद्यांची एकंदर संख्या कित्येक हजार असतांनाही त्यांत फक्त नऊ कैदी नास्तिक सांपडले.......धार्मिक लोक पुष्कळ वेळां म्हणतात, 'अीश्वराची भीति मनांत नसेल तर नीति कशी राहील?' या प्रश्नाला कांही अर्थच राहिलेला नाही हें आतां उघड दिसतें. नास्तिकांची वागणूक सामान्यतः अतिशय उत्तम असते हा नेहमींचा अनुभव आहे." तेव्हा शीलाला आस्तिक्य चिकटवणें म्हणजे या शीलवान म्हणवणाऱ्या लोकांची फसवेगिरी आहे. अशा लेखकांनी दुसऱ्याला शील काय शिकवावें?

वेळीं अवेळीं आपल्या डोक्यांतला अीश्वर मधें घुसडल्याशिवाय या लेखकाचें मुळीच चालत नाही. उदाहरणार्थ 'महत्वाकांक्षा' या सदरांत (पृ. १३) "टिळकांनी लिहिलेला 'गीतारहस्य' हा ग्रंथ अनेक भाषांतून लक्षावधि प्रतींनी अभ्यासिला जात आहे," असें सांगून पुढे लेखक म्हणतो, "युक्तिवाद या दृष्टीने सुद्धां असल्या अद्‌भुत दृश्यांचा नास्तिकांनी विचार करावा व मानवी बुद्धीच्या पलीकडे असलेली अेखादी अद्‌भुत शक्ति आमचें कांही चालू न देतां ती आपल्या अिच्छेप्रमाणे सुधारत चाललेल्या मनुष्याला मार्गदर्शक होते असें कबूल करावें." 'गीतारहस्य' हा ग्रंथ मानवी शक्तीच्या पलीकडे आहे असें आम्हांस मुळीच वाटत नाही. टिळकांना बुद्धि होती यांत शंका नाही, परंतु कांही लोकांना बुद्धि जास्त असते आणि कांहींना कमी असते, यांत कांही अदभुत आहे असें मानणें हा मूर्खपणा आहे. अनेक भाषांत अभ्यासिले जाणारे धार्मिक ग्रंथ अनेक दाखवितां येतील, त्यांतलाच अेक हा. यांत अद्‌भुत काय आहे? "या शक्तीला 'अीश्वर' असें नांव मी देतों. तथापि प्रत्यक्ष पुराव्यानेच अीश्वराचें अस्तित्व मी सप्रयोग सिद्ध करणार आहें." असें लेखक पुढें आश्वासन देतात. शक्तीला अिच्छा असते, आणि ती लोकांना

मार्गदर्शक होते, असें लेखकाचें म्हणणें आहे. ओश्वर मानला तर त्याला डोकें, मेंदू आणि म्हणून अिच्छा वगैरे असतात असें मानतां येअील. परंतु शक्तीलाही डोकें असतें काय ? शरीराशिवाय आणि मेंदूशिवाय बुद्धि आणि अिच्छा असूं शकत नाहीत, हें निदान डाक्तरांना तरी कळायला पाहिजे होतें. हें शक्य असेल तर बिचाऱ्या श्री. ऋषींना मृतात्मे मानण्याबद्दल कां नांवें ठेवावीं ? ओश्वर म्हणा की शक्ति म्हणा, त्याला जर अिच्छा आणि बुद्धि मानायची असेल तर शरीर हें मानलेंच पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाही.

तथापि डॉ. लेल्यांच्या प्रयोगाचा पुरावा काय आहे तो पाहूं. तो प्रयोग असा (पृ. २४) "**पहांटे १ ते ४ च्या दरम्यान** थंड वेळीं व भोंवतालीं सर्वत्र शांतता असतांना, थंड पाण्याने हात पाय व तोंड धुवून आणि थोडें थंड पाणी पिवून आपल्या मनाला जागृत करावें. याशिवाय शेजारीं सुगंधी उदबत्ती पेटवून ठेवली म्हणजे मनाला प्रसन्नताही येते. **यानंतर** सृष्टीच्या वर्णनाचें, ओश्वरविषयक अथवा अेखाद्या सत्पुरुषाचें चरित्र घेऊन त्यामधील मजकूर सुवाच्य व सुबोध अक्षरांनी कोऱ्या कागदावर लिहिण्याला सुरवात करावी. या वेळीं आपले विचार बंद असून आपण छापील मजकूर कोऱ्या कागदावर लिहीत असतांना आपणांला भोंवतालच्या घडामोडींचें 'ज्ञान' होऊं शकतें. उदा० घड्याळांतून आवाज येणें...कुत्रें मांजर पाल इ. ओरडणें... अथवा माणसांच्या बोलींचे आवाज व अनेक वेळां त्यांमधील स्पष्ट अर्थाचे 'शब्द' कानांनी अैकूं येतील. तसेंच, ढेंकूण अथवा दुसरा अेखादा चालणारा किंवा उडणारा कीटक जणूं 'मुद्दाम बोलावल्याप्रमाणें येऊन जाणें' इ. हालचाली डोळ्यांना दिसूं शकतील. याशिवाय, वाऱ्याची झुळूकही अंगाला स्पर्श करील; व अर्धवट उघडें असलेल्या दाराच्या किंवा खिडकीच्या फळीला केव्हांतरी हलवून आवाज करील. भोंवतालच्या सृष्टीमधून आपणाला 'ज्ञान' देणाऱ्या या सर्व 'खुणा' समजून पुस्तकांतील मजकूर लिहितांना येतील तशा या 'खुणा' कंसांत लिहीत जाव्यात; म्हणजे थोड्याच वेळांत छापील मजकुराशीं अथवा आपण लिहीत असलेल्या कागदावरील विचारांशीं भोंवतालची सृष्टि बोलत आहे,

अशी ' शंका ' येऊं लागेल...., या खुणांना मी ' ईश्वराची भाषा ' अशी संज्ञा दिली असून पुस्तकावरून पाहून लिहिण्याऐवजीं ' स्वतःचे विचार ' लिहीत असतांना सुद्धां वरीलप्रमाणें ' खुणा ' येतात व आपल्या विचारांशीं समरस होऊन अडल्या वेळीं आपल्या 'प्रश्नांना उत्तरें' देतात. याप्रमाणें संवय झाल्यावर, आपण दिवसां अथवा रात्रीं कोठेही असलों तरी आपल्या विचारांना उत्तरें मिळूं लागतात. येणेंप्रमाणें ' ईश्वराचें अस्तित्व ' डोळ्यांनी पहायचें नसून या अद्‌भुत शक्तीचा अनुभव चराचर सृष्टीमधून ज्ञानेंद्रियद्वारां घ्यायचा आहे. " अशा तर्‍हेने प्रयोग करून डाक्तरमहाशयांनी ईश्वरप्रेरणेने कांही इंग्रजी कविता १९२७ सालीं लिहिल्याचें सांगितलें आहे. त्या ते छापून प्रसिद्ध करीत आहेत. त्या झाल्यावर ईश्वराला इंग्रजी कविता कितपत लिहितां येतात तें समजेलच. परंतु त्यांनी वर दिलेल्या प्रयोगांतील घडलेल्या गोष्टी जरी खर्‍या धरल्या, तरी त्यांवरुन ईश्वराचें अस्तित्व सिद्ध होत नाही. म्हणजे एकादा ढेंकूण डाक्तरांपाशीं आला, तर त्यांच्या घरांत ढेंकूण आहेत इतकेंच सिद्ध होतें. ढेंकूण त्यांचेकडे मुळीच नसून तो जरी बाहेरुन आला असें धरलें, तरी तो ' बोलावल्याप्रमाणें ' आला असें म्हणण्याचें कारण काय ? तो डाक्तरांना कांही कुशलप्रश्न विचारून गेला काय ? शांत वेळीं सर्व आवाज अधिक स्पष्टपणें ऐकूं येतात हें खरें, परंतु त्यांतले कांही आवाज ' छापील मजकुराशीं किंवा विचारांशीं बोलतात ', याचा कांही अर्थ होतो असें वाटत नाही. या एकंदर लिखाणावरून ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल तर खात्री होत नाहीच, पण डाक्तरसाहेबांच्या मेंदूंत कांहीतरी बिघाड झाला असला पाहिजे याबद्दल मात्र खात्री होते. वेड लागलेला मनुष्य देखील सर्वच बाबतींत वेडा नसतो, कांही विशिष्ट बाबतींत मात्र तो वेडा असतो हा अनुभव सर्वांना आहे. तशीच या लेखकाची स्थिति झालेली आहे. वेड्या माणसाने हें पुस्तक लिहिलेलें आहे, हें त्यांनी सांगितलेल्या प्रयोगावरूनही स्पष्ट दिसतें. तेव्हां तें कोणीही वाचण्याच्या लायकीचें नाही असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही.

र. धों. कर्वे.

२. **फाटकी वाकळ.** लेखक भा. वि. वरेरकर, प्रकाशक, शेठ हिरजी मोहनजी, शंकरबारी लेन, ठाकुरद्वार मुंबई.–२. पृ. १७६ किंमत २। रुपये,

३. **मी रामजोशी** ( फाटकी वाकळ–ठिगळ दुसरें ), लेखक, भा. वि. वरेरकर, प्रकाशक, शेठ हिरजी मोहनजी, पृ. १७१. किं. २॥ रुपये.

हे अेकाच कादंबरीचे दोन भाग आहेत आणि तिसरा भाग अजून प्रसिद्ध व्हायचा आहे. रघुनाथ मराठे नांवाचा अेक कांग्रेसभक्त बी. ए. झाल्यावर आणखी परीक्षांच्या किंवा नोकरीच्या भानगडींत न पडतां जवळच्या नात्याचीं कोणीच माणसें नसल्यामुळे मधें अडचण न येतां स्वतःला ग्रामोद्धारास वाहून घेतो आणि याकरतां कोंकणांतील निमगांव नांवाच्या खेड्यांत जायचें ठरवतो. तो मुंबईहून निघण्यापूर्वी त्याच गांवची त्याच्याच कालेजांतली अेक मुलगी ओळख नसतां त्याला भेटायला येऊन त्याला प्रोत्साहन देते आणि गांवची माहिती सांगते. गांवांत ब्राह्मणवस्ती फारच थोडी असून बहुतेक संख्या वाणी, मराठे, कुणबी वगैरेंचीच होती. या मुलीचा ( किकीचा ) बाप कांग्रेसद्वेष्टा होता, पण ती कांग्रेसभक्त होती. रघुनाथराव निमगावांत मुख्यतः शिक्षणाचें काम करणार असल्यामुळे त्यांना गेल्याबरोबर गुरुजी म्हणूं लागले आणि गुरुजींनी अेका वाण्याकडेच रहायचें ठरवल्यामुळे तेथील ब्राह्मण मंडळी प्रथमपासूनच त्यांना विरोध करूं लागली. तरीपण खालच्या जातींतलीं मुलें शिक्षण घेणार आणि आपलीं मुलें तशींच राहणार, हें ब्राह्मणांना न पटल्यामुळे शेवटीं त्यांचींही मुलें शाळेत जाऊं लागलीं.

शिक्षणाबरोबरच अस्पृश्यतानिवारण आणि मद्यपाननिषेध यांचाही प्रचार गुरुजींना करायचा होता, पण पहिला विषय कुणब्यांनाही पटण्यासरखा नव्हता, आणि गांवांत दारू आणि माडी विकणारे भंडारी बरेच असल्यामुळे दुसराहि विषय कठिणच होता. किकीचे वडील बावीकाका जोशी यांनी त्यांना ब्राह्मण-वस्तींत राहण्याचा बराच आग्रह केला, पण त्यांनी अैकलें नाही. अितकेंच नव्हे तर शाळेंत निदान चांभाराच्या मुलांना तरी वेगळें बसवावें हेंहीं त्यांचें म्हणणें त्यांनी कबूल केलें नाही. पण शेवटीं ब्राह्मणांना मुलें शाळेंत घातल्याशिवाय

गत्यंतर नव्हतें. या सर्व बाबतींत धोंडशेट नांवाच्या अेका आर्यसमाजा भंडारा गृहस्थांचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता.

किकी सुटींत गांवीं आली, पण हें तिचें मुंबअीचें नांव तेथे न उच्चारतां तिचें खरें नांव कमल हेंच वापरावें लागे, आणि तिला भेटणेंही तेथें कठीण होतें, आणि तिच्याबरोबरच गांवीं आलेल्या कांही विद्यार्थ्यांनी त्यांच्या भ्रष्टाचाराचा निषेध करायला सुरवात केली. पण कमलने अेका सभेंत ते सर्व मुंबअीच्या अिराण्याच्या दुकानांत मांस देखील खाणारे आहेत असें जाहीर करून त्यांना फजीत केलें.

नंतर गुरुजींनी वेगळें बिऱ्हाड थाटून त्यांच्या घरचें काम जनी नांवाची अेक कुणब्याची मुलगी आणि तिची आजी मिळून करीत असत. जनीही लिहायला वाचायला शिकली आणि त्यानंतर जेव्हां त्यांनी चरखे आणवून सूत काढायला सुरवात केली, तेव्हां त्या कामांत त्यांना तिची चांगलीच मदत झाली. ब्राह्मणवस्तीचा या उपक्रमाला विरोध होता. पण किकी स्वतः येऊन सूत कांतायला शिकवींत होती. पण यामुळे बाबीकाकांनी गुरुजींबद्दल नाना कंड्या पिकवायला सुरवात केली. जनीशीं त्यांचें सूत जमलें आहे अशीही बातमी त्यांनी पसरविली. किकी निघून गेल्यावरही जनीच्या मदतीनें सूत कांतायचें काम चाललेंच होतें, आणि दोन माग आणि तें चालवण्याकरतां कोष्टी आणवून कापड काढण्याचाही प्रयोग सुरू झाला.

किकी पुन: आली तेव्हां ती त्यांना न भेटतांच मुंबअीहून आणलेल्या चरख्यांवर सूत काढण्याकरतां बक्षिसें लावून मुलांकडून सूत काढवून घेत होती. पण बाबीकाकांनी तें चालूं दिलें नाही आणि ते चरखे देऊन टाकले आणि कमळला मारीत घरीं नेलें. तेव्हां ती घरांतून पळून गेली आणि गुरुजीकडे येऊन राहिली. बाबीकाका चिडले आणि त्यांनी गुरुजींनाही तंबी देऊन पाहिली, पण मुलगी सज्ञान असल्यामुळे त्यांना कांही करतां आलें नाही. ती मास्तरणीचें काम करूं लागली. पण अिकडे किकीची आअी आजारी पडली तरी बाबीकाकांनी तिला भेटायची परवानगी दिली नाही आणि ती वारल्यावर तिला

स्मशानांत पहायची देखील संधि दिली नाही.

अिकडे गुरुजींनी गांवांतल्या लोकांकडून अेक लहानसा रस्ता तयार करवला आणि आणखी कार्यक्रम काय करावा याचा विचार चालवला. मध्यंतरी त्यांना जनींसंबंधी चमत्कारिक हकीकत कळली. तिच्या आअीशीं बाबीकाकांचा संबंध असून ती त्यांचीच मुलगी अशी गांवांत बोलवा होती, पण तिच्या आजीने हकीकत सांगितली तेव्हां समजलें की, बाबीकाकांचा तसा प्रयत्न होता पण तो निष्फळ झाल्यामुळें त्यानीच तशी कंडी पिकवली होती, आणि अेवढ्यावरून तिच्या नवऱ्याने तिचा खून केला होता. जनी आपली बहिण अशीच किकीचीही समजूत होती.

येथे पहिला भाग संपतो. किकीचें व जनीचें दोघींचेंही प्रेम गुरुजींवर आहे असें यांत स्पष्ट झालें आहे, तरी कोणालाच लग्नाची गोष्ट काढणें शक्य नसल्यामुळे कांही करतां येणें शक्य नव्हतें.

दुसऱ्या भागांत मुख्यः अस्पृश्यतानिवारणाचाच प्रश्न हाताळलेला आहे. त्याकरतां गुरुजींना शिमग्यांत आणि तमाशांतही सामील व्हावें लागलें आणि यामुळें किकीचाही त्यांच्यावर रोष झाला. परंतु तमाशांत प्रचार करतां येतो आणि खालच्या लोकांना वर आणायला हा अेक उत्तम मार्ग होअील हें तिलाहि शेवटीं पटलें. शिमग्यांत ढोल वाजवायचा हक्क महारांचा असतो, पण होळीच्या दिवशीं मात्र होळी पेटेपर्यंत कोणीही शिवाशिव पाळायची नाही आणि ब्राह्मणांनीही ढोल वाजवायचा अशी पद्धत होती. होळी पेटल्याबरोबर मात्र ब्राह्मणांनी ढोल खाली ठेवून ते महारांनी घ्यायचे अशी रीत होती. गुरुजी या सर्वांत सामील होऊन होळी पेटल्यानंतर देखील पुनः ढोल वाजवूं लागलेले पाहून ब्राह्मणांनी त्यांचा निषेध केला, पण कांहींनी त्यांचें अनुकरण केलें आणि तेथून प्रचाराला सुरवात झाली. तें किकीला पटल्यावर तमाशांत सुधारणा करण्याकरतां विशिष्ट प्रकारच्या लावण्या तयार करवून त्या म्हटल्या पाहिजेत असें गुरुजींनी ठरवलें. पण तमासगिरांचें आणि श्रोत्यांचेंही त्यांनी समाधान होअीना. तेव्हां जनी आणि किकी यांनी स्वतः नृत्याचे धडे घेऊन आणि लावण्या कोणाकडून तरी

मिळवून तमाशे करायला सुरवात केली. पुष्कळ दिवस गुपित राखल्यावर शेवटीं गुरुजींना कळलें की या लावण्या जनीच लिहीत होती. येथे दुसरा भाग संपतो.

कादंबऱ्या या दृष्टीने हे दोन्हीही भाग उच्च दर्जाचे आहेत. परंतु त्यांतील खादीचें तत्वज्ञान आणि शेतकऱ्यांना पुष्कळ रिकामपण असतें ही कल्पना, हीं दोन्ही साफ चुकीचीं आहेत. ही दुसरी गोष्ट कोंकणांत शेती केलेले आणि पाहिलेले लोक मुळीच कबूल करीत नाहीत, आणि ज्याने त्यानें आपआपल्या पुरतें कापड तयार करणें अिष्ट आहे ही कल्पनाच हास्यास्पद आहे. स्वतः तयार केलेला कपडा वापरण्यांत कोणाला भूषणही वाटेल हें खरें. पण हें तत्व म्हणून जर पुढें ठेवायचें असेल, तर प्रत्येकाने स्वतःला लागणारें अन्न उत्पन्न केलें पाहिजे, तें स्वतःच शिजवलें पाहिजे, स्वतःचें घर स्वतःच बांधलें पाहिजे, असें कां म्हणूं नये ? दुसऱ्याच्या श्रमाचा उपयोग करायचा नाही असें ठरवल्यास आणि तें शक्य असल्यास समाजाचा उपयोग काय ? असलेल्या शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग न करतां पुनः रानटी स्थितींत राहण्याचा हा प्रयत्न कोणालाही पटण्यासारखा नाही. शेतकऱ्यांची बेकारी आणि उपासमार यांतून हा मार्ग आहे असें गांधी सांगतात. परंतु तो व्यवहार्य नाही. मध्यम वर्गाच्या बेकारीवर आम्ही अेकदां सुचवलेला याच प्रकारचा मार्ग म्हणजे छापखान्यांचा उपयोग करायचा नाही असें ठरवल्यास सर्वच हाताने किंवा लेखनयंत्राने लिहावें लागेल, आणि सर्व लिहितांवाचतां येणारांना तो एक धंदा होअील. हा मार्गही खादीअितकाच सुलभ आहे, पण मामा वरेरकर लेखक असल्यामुळे त्यांना तो पटणार नाही, कारण मग पुस्तकें कशीं खपणार ? गांधींमुळे या मूर्खपणाला महत्व आलें आहे. त्यांच्यामागें खादीला कोणी विचारणार नाही हें उघड आहे.

र. धों. कर्वे.

---

# तीन लघुतम कथा

लेखक, स. हृदय, महाड.

१

## अनुनय

तोः—‘ कसें सांगू तुला मी ? ’ तीः—‘ काय तें ? ’

तोः—( कष्टाने ) माझी पत्नी नुकतीच निवर्तली.

तीः—( हलकेच ) अयाओीऽऽ

तोः—( वेळाने ) माझें तुझ्यावर प्रेम जडलंय्.

तीः—खरें ? किती भाग्याची मी !

तोः—मी बँकेंत नोकरीला असतों.

तीः—फारच आवडलां तुम्ही मला.

तोः—नि मी फावल्या वेळांत कविताही करतों.

तीः—(गळ्यांत पडून) अहाहाऽऽ ! किती किती रोमॅन्टिक आहांत तुम्ही !

तोः—( खुषींत ) तूं माझ्याशीं लग्न करशील ?

तीः—(फुरंगटून) किती मूर्ख आहांत तुम्ही ! अहो, माझं लग्न झालंय् !

२

## व्हिटॅमीन ‘ अेल् ओ व्ही ई ’

हरिहर डाक्तर होण्यापूर्वींच त्याचें लग्न झालें होतें. त्याचें आपल्या पत्नी-वर प्रेम होतें. त्याला मुलेंही झालीं होतीं. मी त्याचा स्नेही होतों.

प्रॅक्टिस करण्यास सुरवात केल्यापासून कांहीं केल्या त्याचा जम बसेना. तीन वर्षें तशींच गेलीं. त्यामुळे त्याच्याकडे चुकूनमाकून आलेल्या गिऱ्हाअिकाव-र तो चिडे, नि संताप. त्याचें होतें तें गिऱ्हाअिक हळूहळू कमी होऊं लागलें.

असे कांही दिवस गेल्यावर तो अेकाअेकीं टेनिस खेळूं लागला, दररोज दाढी बनवूं लागला, सुटांमध्यें हिंडूं लागला, बटनहोलमध्यें फुलें अडकवूं लागला, नि सिनेमांतील गाणीं गुणगुणूं लागला. त्याचा स्वभाव मनमिळावू झाला. तो सर्वांशीं गोडीने वागूं लागला. हंसूं लागला.

त्याची डाक्तरी चालूं लागली, गिन्हाअिकी वाढली, पैसे मिळूं लागले. आपल्या मुलांबाळांशीं, पत्नीशीं तो आनंदाने वागूं लागला, त्यांना घेऊन सिनेमा पाहूं लागला.

त्याच्या जीवनांत अशी अेकाअेकीं घडामोड झालेली पाहून मी मनाचा हिय्या करून अेके दिवशीं सायंकाळीं त्याला त्याचें कारण विचारलें. हरिहर हंसला. प्रथम तो कांहीच बोलेना. मी म्हटलें, ' अरे हा अिलम कोठें पैदा केलास बाबा ? ' ' कसला ? '

' नाही, म्हटलें, कोणत्या नवीन व्हिटॅमीनचा शोध लावलास तूं ? '

तो रंगांत आला होता. त्याने आपल्या अेका नाजूक रोग्याची हकीकत सांगितली. मी चाट पडलों.

' घरांत कांही बोलूं नकोस हां, ' त्याने मला बजावलें. तोंच घड्याळांत सातांचे ठोके पडले.

चटकन हरिहर गॅलरींत गेला. त्याने मला बोलावून घेतलें. अितक्यांत शेजारच्या बंगल्याच्या गच्चीवर अेका सुंदर तरुणीने प्रवेश केला. हरिहरने मला चिमटा घेतला. मी सारें कांही समजलों.

' पाहिलेंस ? येअील कोणाला संशय आमचा ? '

---

## ३

# विनयभंग

भाअी कोकिळला अेका व्याख्यानाला घाअीघाअीने जाणें भाग पडलें होतें. मित्राला चहा पाजला, उरलेल्या दिडक्यांच्या सिगार्स घेतल्या. ट्रॅमसाठी खिशांत पैसे नव्हते. आतां नेमकाच मित्र भेटण्याचाही संभव नव्हता. दीड मैल

चालत जाऊन सभेला हजर राहण्याचें त्यानें ठरवलें. तो भराभर चालूं लागला.

सायंकाळची वेळ होती, फूटपाथवर गर्दी होती. त्या साऱ्यांना डावलून जाणें आणि जलदीने चालणें या गोष्टी त्याला जमेनात. आणि शेवटीं त्याचा धक्का अेका सुंदरशा स्त्रीला लागलाच.

'मेल्या चांडाळा ! तुला आयाबहिणी आहेत की नाहीत ?' त्या सुंदरीने आपल्या चपलेला हात घातला.

'माफ करा हां ! मी घाअींत आहें...चुकून...'

'करून सवरून...मेल्यांनो...मुद्दामच धक्के मारतात...' त्या तरुणीनें त्यांना अेक चप्पल आपल्या नाजूक आवेशांत आणि कमनीय हावभावांत मारलीच.

तो चकित झाला, चिडला, आणि हताशही झाला. करणार काय ? लोक गोळा झाले. सर्वांनी त्या मोहक तरुणीची बाजू उचलून धरली.

भाअी कोकिळला गिरगांव पोलीस ठाण्यांत नेण्यांत आलें. त्यानेही सर्व कांही बिनतक्रार सहन करण्याचें ठरवलें. योग्य वेळीं खटला चालला, साक्षीपुरावे झाले. श्री. कोकिळांनी आपला बचाव म्हणून जें कांही बोलायचें तें बोलून टाकलें. अखेरीस मॅजिस्ट्रेटसाहेबांनी त्याला दहा रुपये दंडाची शिक्षा फर्मावली. दंडाच्या अभावीं त्याने कोर्ट उठेपर्यंत कोर्टाच्या आवारांत बसण्याची शिक्षा भोगली.

त्या दिवशीं त्याला चैन पडेना. मानवधर्माचें त्याचें आकलन थिटें पडलें. क्षमायाचनेला जगांत कांहीच अर्थ नसावा ? प्रामाणिकपणा असा ठोकरीने उडवला जावा याची त्याला चीड आली. त्याचें मन प्रक्षोभकारक विचारांनी सुन्न झालें. त्याला कोठेच विसावा वाटेना. त्या दिवशीं त्याचा खिसा गरम होता, पण सिनेमाला जाण्यास मन धजेना.

शेवटीं तो चौपाटीवर जाऊन आला आणि गिरगांवांतून आपल्या घराकडे जातांना वाटेंत खिडकींतून डोकावणाऱ्या अेका मुखमंडलाच्या मोहाने अेका माडीवर तो तडक चढून गेला. दिवाणखान्यांतील प्रौढेशीं बातचीत करून तो आंतील खोलींत शिरला.

चालत जाऊन सभेला हजर राहण्याचें त्यानें ठरवलें. तो भराभर चालूं लागला.

सायंकाळची वेळ होती, फूटपाथवर गर्दी होती. त्या साऱ्यांना डावलून जाणें आणि जलदीने चालणें या गोष्टी त्याला जमेनात. आणि शेवटीं त्याचा धक्का अेका सुंदरशा स्त्रीला लागलाच.

'मेल्या चांडाळा! तुला आयाबहिणी आहेत की नाहीत?' त्या सुंदरीने आपल्या चपलेला हात घातला.

'माफ करा हां! मी घाअींत आहें...चुकून...'

'करून सवरून...मेल्यांनो...मुद्दामच धक्के मारतात...' त्या तरुणीने त्यांना अेक चप्पल आपल्या नाजूक आवेशांत आणि कमनीय हावभावांत मारलीच.

तो चकित झाला, चिडला, आणि हताशही झाला. करणार काय? लोक गोळा झाले. सर्वांनी त्या मोहक तरुणीची बाजू उचलून धरली.

भाअी कोकिळला गिरगांव पोलीस ठाण्यांत नेण्यांत आलें. त्यानेही सर्व कांही बिनतक्रार सहन करण्याचें ठरवलें. योग्य वेळीं खटला चालला, साक्षीपुरावे झाले. श्री. कोकिळांनी आपला बचाव म्हणून जें कांही बोलायचें तें बोलून टाकलें. अखेरीस मॅजिस्ट्रेटसाहेबांनी त्याला दहा रुपये दंडाची शिक्षा फर्मावली. दंडाच्या अभावीं त्याने कोर्ट उठेपर्यंत कोर्टाच्या आवारांत बसण्याची शिक्षा भोगली.

त्या दिवशीं त्याला चैन पडेना. मानवधर्माचें त्याचें आकलन थिटें पडलें. क्षमायाचनेला जगांत कांहीच अर्थ नसावा? प्रामाणिकपणा असा ठोकरीने उडवला जावा याची त्याला चीड आली. त्याचें मन प्रक्षोभकारक विचारांनी सुन्न झालें. त्याला कोठेच विसावा वाटेना. त्या दिवशीं त्याचा खिसा गरम होता, पण सिनेमाला जाण्यास मन धजेना.

शेवटीं तो चौपाटीवर जाऊन आला आणि गिरगांवांतून आपल्या घराकडे जातांना वाटेंत खिडक्यांतून डोकावणाऱ्या अेका मुखमंडलाच्या मोहाने अेका माडीवर तो तडक चढून गेला. दिवाणखान्यांतील प्रौढेशीं बातचीत करून तो आंतील खोलींत शिरला.

तों तीच ती सुंदर तरुण स्त्री! तिनेच त्याच्यावर विनयभंगाचा खटला भरला होता. त्याचा सर्व भर ओसरला. आंब्याचा मोहोर पार गळून पडला. भीति की विषाद, काय तें त्याचें त्यालाच समजेना. तो मागल्या पावलीं परतूं लागला.

'कां हो, या ना! असे घाबरतां काय!' ती युवती माना वेळीत हंसतच पुढें आली. तिने भाअी कोकिळचा हात धरला. तो कंपायमान होत होता.

'पहिलीच वेळ दिसतेय!' तिने हलक्या पण नाजूक आवाजांत सहानुभूतीने त्याच्याकडे दृष्टिक्षेप केला.

'मला तुम्ही ओळखलें नाही?' शेवटीं त्याने भीतभीत विचारलें.

'हो, प्रथमच मी ओळखलें कीं! तुम्हीच ते. पण गडे, भररस्त्यावर अशी कोण कुणाशीं लगट करतें वाटतें? क्षमा करावी गडे मला.'

तो चाट पडला.

---

## जुळीं मुलें

शिकागो युनिव्हर्सिटींतील जीवनशास्त्राचे प्रो. न्यूमन यांनी या विषयावर गेल्या सालीं अेक पुस्तक प्रसिद्ध करून त्यांत अेका वेळीं झालेल्या अेकापेक्षा अधिक मुलांचा विचार केला आहे. अशा मुलांसंबंधी ज्या अनेक चुकीच्या समजुती असतात, त्यांचा त्यांनी प्रथम विचार केला आहे. उदाहरणार्थ शेक्सपिअरच्या अेका नाटकांत भाऊ आणि बहिण हीं जुळीं असून तीं हुबेहुब अेकमेकांसारखीं आहेत असें दाखवलें आहे, परंतु ही शेक्सपिअरची चूक आहे, कारण जीं जुळीं हुबेहुब अेकमेकांसारखीं असतात तीं भिन्नलिंगी असणें शक्य नसतें. याचें कारण असें कीं जुळीं मुलें होण्याचे जे दोन प्रकार आहेत, म्हणजे (१) अेकाच बीजाचे दोन विभाग होऊन ते वेगळे वाढीला लागल्यामुळे होणारीं जुळीं, आणि (२) अेकाच वेळीं दोन पक्व बीजें स्त्रीच्या शरीरांत हजर असल्यामुळे त्या दोघांचाही रेतजंतूंशीं संयोग होऊन तीं दोन्ही

वाढीला लागल्यामुळे होणारीं जुळीं, या दोन प्रकारांपैकी फक्त पहिल्या प्रकारचींच जुळीं हुबेहुब अेकमेकांसारखीं असतात, आणि तीं अेकाच बीजापासून झालेलीं असल्यामुळे त्यांचे लिंग अेकच असतें. दुसऱ्या प्रकारांत दोन वेगळीं बीजें असल्यामुळे अशा जुळ्यांत सामान्यतः भावंडांत सापडणारें साम्य असलें तरी तीं हुबेहुब सारखीं नसतात. तेव्हा भिन्नलिंगी जुळीं हुबेहुब सारखीं दाखवणें ही चूक आहे. अर्थात् शेक्सपिअरच्या कालांत जुळ्यांसंबंधी अितकी शास्त्रीय माहिती कोणालाच नसेल, तेव्हा या चुकीबद्दल त्याला दोष देतां येणार नाही.

कांही प्राथमिक लोकांत जुळीं होणें हें भाग्याचें लक्षण समजतात आणि अितर कांही लोकांत तें फार भयंकर समजतात. कित्येक ठिकाणीं अेखाद्या स्त्रीला जुळीं झाल्यास तिला आणि त्या मुलांना ठार मारतात, कारण अेकाच पुरुषाशीं समागमाने अेका वेळीं दोन किंवा अधिक मुलें होणें शक्य नाही अशी त्या लोकांची कल्पना असते, यामुळे ती स्त्री व्यभिचारिणी असल्याचा तो पुरावाच मानतात.

अर्थात् या पुस्तकांत दोहोंपेक्षा अधिक मुलांचाही विचार केला आहे. जुळीं होण्याचीं जीं कारणें दिलीं आहेत त्यांवरून आनुवंशिकता हें अेक कारण असेल, किंवा गर्भाशयांतील परिस्थिति हेंहि कारण असणें शक्य आहे. कॅनडामधील अेका स्त्रीला अेकदम झालेल्या पांच मुलांची हकीकत पुष्कळांना माहीत असेल. तीं पांची मुलें अेकाच बीजापासून झालीं असलीं पाहिजेत, असा निर्विवाद पुरावा लेखकाने दिला आहे. बीज वाढीला लागलें म्हणजे त्याचे प्रथम दोन भाग होतात, नंतर त्या प्रत्येकाचे दोन होतात, नंतर पुनः प्रत्येकाचे दोन, याप्रमाणें भाग होत जाऊन त्यांपैकी कांही भाग वेगळे वाढीला लागले म्हणजे अेका बीजापासून पाहिजे तितकीं जुळीं मुलें होणें शक्य असतें.

शेवटीं डॉ. न्यूमन यांच्या विशेष आवडत्या विषयाचा विचार केला आहे. त्यांनी अेका बीजापासून झालेल्या जुळ्यांच्या वीस जोड्या अशा घेतल्या की जन्मानंतर कांही दिवसांनी किंवा आठवड्यांनी तीं अेकमेकांपासून दूर होऊन वेगवेगळ्या ठिकाणीं आणि कित्येक वेळां वेगळ्या देशांत वाढवलीं गेलीं. हीं मुलें

मोठीं झाल्यावर प्रत्येक जोडीला शिकागो येथे आणून त्यांची डॉ. न्यूमन यांच्या समक्ष भेट करवली, आणि नंतर त्यांची शारीरिक, मानसिक, भावनात्मक वगैरे तुलनात्मक परीक्षा केली. त्याचप्रमाणें अेकत्र वाढलेल्या जुळया मुलांच्या पन्नास जोड्या घेऊन त्यांची अशाच रीतीने तुलना करून, शेवटीं या दोन गटांवरून मनुष्याच्या शारीरिक, मानसिक व भावनात्मक वाढीवर आनुवंशिक कारणांचा परिणाम काय प्रमाणांत होतो, आणि परिस्थितीचा परिणाम किती होतो, हें ठरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी असा निष्कर्ष काढला की वेगवेगळ्या वाढवलेल्या आणि अेकत्र वाढवलेल्या जुळयांच्या शारीरिक सारखेपणांत फक्त अेकाच बाबतींत तफावत दिसते, आणि ती अेक बाब म्हणजे शरीराचें वजन, कारण हें त्यांना मिळणाऱ्या अन्नावर, व्यायामावर आणि आरोग्यावर अवलंबतें. मानसिक बाबतींत मात्र या दोन गटांत अधिक तफावत सांपडते. बुद्धिमत्ता अजमावण्याची जी अमेरिकन पद्धत आहे, तिने प्रत्येक मनुष्याची विशिष्ट तऱ्हेने परीक्षा घेऊन बुद्धिमत्तेचें माप म्हणून अेक आंकडा काढतात, त्याला 'आय्. क्यू.' (अिंटेलिजन्स कोशंट) म्हणतात. अेकत्र वाढलेल्या जुळ्यांतील प्रत्येक जोडींत या आंकड्यांत किती फरक पडतो हें पाहिलें, तेव्हा सरासरीने हा फरक ५·३ निघाला. परंतु वेगळया वाढलेल्या जोड्यांत हा फरक ८·२ निघाला. हा फरक पडण्याचें विशेष कारण म्हणजे या दुसऱ्या गटांतील चार जोड्यांचे बाबतींत शिक्षणांत अतिशय फरक होता. यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात, त्या अशा की अेकतर जुळया मुलांत शारीरिक फरक बिलकुल नसला तरीहि मानसिक फरक बराच असूं शकतो, आणि हा फरक परिस्थितीने, विशेषतः शिक्षणाने पुष्कळच वाढूं शकतो.

वर उल्लेखिलेल्या पांच जुळया मुलींचे बाबतींत डॉ. न्यूमन यांनी असें मत दिलें आहे की त्या मुली वास्तविक सहा असायला पाहिजे होत्या, परंतु गर्भाशयांत तीन महिने राहिल्यावर तो सहावा गर्भ मेला. याबद्दल कांही डाक्टरांनी मतभेद दाखवला आहे.

---

# पत्रव्यवहार

१

**अेक विचित्र घटनाः** - माझा मुलगा, हल्ली ज्याचें वय १४
आहे, हा जन्मल्यापासून मुलगी म्हणून गणला जात असे व याला मु
वेषांत ठेवून अिंदिरा या नांवाने प्रायमरीचें पूर्ण शिक्षण करवलें. प
दीड वर्षापासून ही मुलगी नसून मुलगा आहे असें नैसर्गिक वैचित्र
आहे, कारण त्याचे शरीराची वाढ मुलीप्रमाणें न होतां मुलाप्रमा
लागली आहे. ह्याला पुरुषलिंग असून अंडकोष जन्मतःच नाहीत,
लिंगाचे खालचे बाजूस अंडकोषाचे जागेवर स्त्रीजननेंद्रिय असून त्यांत
अेक छिद्र असून या छिद्रांतूनच मूत्रविसर्जन होत असतें. ह्याला पु
दाढीमिशा येऊं लागल्या आणि मुलीप्रमाणें छातींत उंचपणा न येत
येत आहे. या मुलाकरतां आजपावेतों बरेचसे औषधोपचार केले, पर
फायदा झाला नाही. फक्त आतां दोन महिन्यांपासून अेक होमि
डाक्तर राजाभोज यांचा उपचार चालू आहे व अीश्वरकृपेने बराचसा
होत आहे. तरी तज्ञांनी या बाबतींत उपचार कळवल्यास मी त्य
आभारी होअीन.

**वासुदेव बाळकृष्ण शि**

---

आपण आपले पत्रांत वरील बातमी छापून ह्यासंबंधी चर्चात्म
लिहावा, पण माझा हेतु असा आहे की डाक्तरी सूच
मिळावी, म्हणजे उपचार करण्यास अधिक सुलभ होअील. ह्याकर
वाचकांस तशी सूचना करावी ही विनंति आहे. ह्याचें
माझे उपचाराचे अगोदर दीड अिंच लांब व अेक अिंच परिघ, असें
औषधोपचारापासून आतां लांबी साडेतीन व परिघ तीन अिंच झ
उत्थापनही होत असतें. पूर्वी उत्थापन होत नव्हतें. ह्यास अंडगो

बारीक आहेत असें स्पर्श करून पाहिलें म्हणजे कळतें. आपला कृपाभिलाषी, **डी. एल्. राजाभोज,** राजा बिल्डिंग, नाओक रोड, सर्कल ४, नागपूर.

**उ.** यासंबंधी कोणा डाक्तरांकडून कांही सूचना आल्यास छापूं. श्री. शिवणकर यांच्या पत्रावरून उपचारांचा फायदा ओश्वरकृपेने होत आहे असें त्यांचें मत दिसतें. तसें असलें तर पूर्वी केलेल्या उपचारांचा फायदा कां झाला नाही ? तेव्हां ओश्वरकृपा नव्हती आणि आतांच झाली ? जन्मतः मुलांत असा दोष ठेवून नंतर बरेच उपचार होओीपर्यंत कृपा न करतां आतांच ओश्वराने कृपा करावी, ही त्याची करणी अगाधच दिसते. पण ती अगाध नसली तर तो ओश्वर कसला ? **सं.**

## २

**१.** आम्ही बरींच वर्षें संततिप्रतिबंधक साधनें वापरीत असतों व त्यामुळे आम्हास गेल्या पंधरा वर्षांत मूल झालें नाही. माझें वय ५० वर्षांचें असून माझ्या पत्नीचें वय सुमारें ४४ वर्षांचें आहे. गेल्या दोन वर्षांपासून तिचा विटाळ बंद आहे. आम्हास संततिप्रतिबंधक साधनें वापरण्याचा कंटाळा आला आहे, तरी आतां साधनें वापरण्याचें बंद केल्यास मुलें होण्याचा संभव आहे काय ? आम्हास चार मुलें आहेत व या वयांत आणखी मुलें नको आहेत. विटाळ बंद झाल्यावरही कांही स्त्रियांस मुलें होतात असें म्हणतात. हें कितपत खरें आहे ? माझ्या पत्नीची लैंगिक भूक बरीच कमी झालेली आहेसें दिसतें. विटाळ बंद झाल्यावर मुलें होण्याचा संभव असल्यास तो पुढें किती वर्षेंपर्यंत असतो ? आम्हीं प्रतिबंधक साधनें वापरण्याचें बंद करावें का ? **२.** मी आपलें आहारशास्त्र वाचलें आहे. त्यांत अेके ठिकाणीं स्त्रियांस मुलांना मांडीवर आडवें घेऊन पाजूं नये हें माहीत नाही असें म्हटलें आहे. आडवें घेऊन कां पाजूं नये ? पाजल्यास काय नुकसान होतें ? **३.** तसेंच सदरील पुस्तकांत कच्च्या आहाराचा ब्लड प्रेशर कमी होण्यास उपयोग होतो व हा कच्च्या आहाराचा प्रयोग आपण स्वतःवर करून पुष्कळ विलायतेच्या परीक्षा देऊन आलेल्या डाक्तरांकडूनही हा आपला आजार बरा झाला नाही तो कच्च्या आहाराने बरा झाला असें म्हटलें

आहे व यासंबंधी समाजस्वास्थ्याच्या अेका मागील अंकांतही उल्लेख आलेला आहे. कच्च्या आहारांत ब्लड प्रेशर कमी करणारीं कोणचीं द्रव्यें असतात याचा खुलासा कराल का? पूर्ण वाढ झालेल्या मनुष्यास साधारणपणें २५०० ते ३००० कॅलोरी उष्णता उत्पन्न करणारें अन्न लागतें. आपण कोणकोणते पदार्थ किती प्रमाणांत दररोज खात होतां व या प्रत्येक पदार्थांत किती कॅलोरी उष्णता उत्पन्न करण्याची शक्ति होती? आपण आपणावर केलेल्या प्रयोगाचे वेळीं कॅलोरीचा हिशोब केला असेलच. करितां या प्रयोगांत आपण उपयोगांत आणलेले कच्चे पदार्थ व त्यांचें प्रमाण व त्यांची कॅलोरिक व्हॅल्यू पुढील अंकांत द्याल तर बरें होअील. अलीकडे ब्लड प्रेशरची तक्रार वाढत्या प्रमाणांत आढळून येते, तेव्हां सामान्य माणसास हा प्रयोग सविस्तर समजल्यास फायदेशीर होअील. मी समाजस्वास्थ्याचा बरेच दिवसांचा वाचक असल्यामुळे त्याची भरभराट व्हावी असें वाटतें. करितां त्यांत पूर्वी येत असत त्याप्रमाणें स्वयंपाकाचे कांही नवे प्रकार व अितर कांही उपयुक्त विषयांवर लेख यावे अशी विनंती आहे. आपला **अेक वाचक.**

उ. १. विटाळ बंद झाल्यावर मूल झालें असें कधीकधी आढळतें, याचें कारण अितकेंच की विटाळ बंद होण्याचे सुमारास तो अेकदम बंद न होतां पुष्कळ वेळां बराच अनियमित होतो. यामुळे तो खरोखर बंद झाला की नाही याबद्दल नेहमी संशय राहतो, आणि अशा वेळीं मूल झालें तर त्याचा अर्थ अितकाच असतो की विटाळ खरोखर बंद झालेला नसतो. पण वरवर पाहणाराला मात्र असेंच वाटतें की विटाळ बंद झाल्यावर मूल झालें. आपल्या पत्नीच्या वयावरून तो बहुधा बंद झालेला असावा असें वाटतें, तरीपण आणखी अेखादें वर्ष संततिनियमनाचीं साधनें वापरावीं असा आमचा सल्ला आहे. २. मुलांना आडवें घेऊन पाजणें हें आयांना सोयीस्कर पडत असेल, पण तें पिणाऱ्या मुलांना सोयीचें नसतें. अेखाद्या मोठ्या माणसानें उताणें पडून कांहीही पिण्याचा प्रयत्न करून पहावें, म्हणजे त्यांतली गैरसोय लक्षांत येअील. भांड्यांतून पाणी पिवूं लागल्यास तें सांडेल ही गैरसोय अर्थातच मुलाचे बाबतींत नसते, तथापि

लहान मुलाची दुधाची बाटली घेतल्यास सांडण्याची भीति राहणार नाही. उताणें पडून पिण्याने दूध सरळ अन्ननलिकेंत जाण्यास अडचण पडते, असें मत अेका फ्रेंच डाक्तराने दिले आहे, व तें आम्हांस पसंत आहे. ३. कच्च्या आणि शिजलेल्या आहारांत मुख्य फरक व्हिटॅमीनचे बाबतींत होतो आणि तीं शरीराला योग्य प्रमाणांत मिळत नाहीत. यामुळेच कच्चा आहार शरीराला अधिक मानवतो, आणि प्रकृति सर्व बाबतींत अधिक चांगली होते. ब्लड प्रेशर (रक्तदाब) ही यामुळेच कमी होत असलें पाहिजे, निदान याशिवाय दुसरें कांही कारण दिसत नाही. वजन फाजील वाढलें असल्यास तेंही कच्च्या आहाराने कमी होतें, आणि याचाही परिणाम रक्तदाबावर होतो. प्रकृति सुधारल्याचीं चिन्हें आठच दिवसांत दिसूं लागतात. कच्च्या आहारास सुरवात करतेवेळीं कॅलोरीचा हिशोब केलाच पाहिजे, कारण कॅलोरी पुरेशा न झाल्यास हातून काम पुरेसें होणार नाही. कच्च्या आहारांतील मुख्य तत्व असें कीं जे पदार्थ कच्चे खायला चांगले लागतात तेच खावे. लोक भात खातात म्हणून आपण तांदूळ कच्चे खाऊं नये. शिवाय अेकाला जे पदार्थ मानवले तेच सर्वांना मानवतील असा नियम नसतो. तथापि जे पदार्थ आवडतात ते सामान्यतः मानवतात (हा नियम शिजलेल्या किंवा तळलेल्या अन्नाला मात्र लागू नाही). आम्ही त्या वेळीं कॅलोरीचा हिशोब केला होता, परंतु तो आतां उपलब्ध नाही. हा हिशोब कसा करावा हें आमचे पुस्तकांत सांगितलें आहे. आम्ही काय खात होतों हें मात्र सांगतों. भुईमुगाचे दाणे (चांगले फुगतील अितका वेळ भिजवून), नारळ, केळीं व ताक, हे आहारांतील मुख्य पदार्थ. दिवसांतून सुमारें पांचसहा मोठीं केळीं, अेक औंस दाणे (कोरडें वजन), दोन मोठीं ग्लासें भरून ताक (दुधापेक्षा ताक पचनास बरें); याशिवाय मुळे, गाजरें, रताळीं, कांकड्या, टमाटो, लेटयूस किंवा इतर कच्चीं पानें, व मोसमाप्रमाणें मिळतील तीं फळें; बदाम, अक्रोड, खजूर, बेदाणा, यांपैकी पाहिजे ते पदार्थ खाण्यास हरकत नाही. कोणाला आहार कमी लागतो, कोणाला जास्त लागतो. परंतु कच्च्या आहारांत फाजील खाण्याची फारशी धास्ती नसते. यांत केळीं आणि ताक (लोणी काढल्याशिवाय) हे दोन पदार्थ

अतिशय महत्वाचे आहेत. हे दोन्ही घेतल्यास शरीराला जरूर ते सर्व पदार्थ मिळतात, आणि बाकी मनाला वाटतील ते पदार्थ खाल्ले तरी चालतात. आपल्याला काय मानवतें आणि काय नाही, हें स्वतःच्या अनुभवानेच ठरवावें लागतें, कारण यांत प्रत्येकाचा अनुभव वेगळा असतो. ४. स्वयंपाकासंबंधी माहिती अजूनही कोणीं पाठवल्यास देवूं. आम्हाला स्वतःला त्यांत संशोधन करण्यास वेळ नाही. मासिकांत आमचे मतें उपयुक्त असेच लेख आम्ही देतों. तथापि याबद्दल मतभेद होणें शक्य आहे. **सं.**

**३.**

माझी बायको थोड्याच दिवसांपूर्वी प्रसूत होऊन तिला मुलगी झाली, परंतु त्या मुलीला उजवा कान अजीबात नाही. याचें कारण काय असावें? याला कांही योग्य मार्ग असेल तर तो दाखवाल अशी नम्र विनंति आहे.

आपला **दीनानाथ.**

**उ.** गर्भाची वाढ होतांना असे अनेक प्रकारचे दोष राहतात, त्याचें कारण सांगतां येअील असें वाटत नाही, आणि त्यावर कांही उपायही दिसत नाही. यूरोपांतही अशी अेक मुलगी आम्ही पाहिली होती व तेथे उत्तम डाक्टर असतांही कांही उपाय करतां आला नव्हता. मात्र ती थोडी मोठी झाल्यावर तिच्या केंसांचीं दोन्ही कानांवर दोन वेंटाळीं करून कान झाकून टाकल्यामुळे तिचा हा दोष कोणाला दिसत नसे. आमच्या एका मित्राने सहज अेकदां त्यांत अेक वेंटाळें उचलून पाहिल्यामुळे तिला अेक कान नाही हें त्याला दिसलें व तिची आअी तेथे हजर होती तिने त्याला काकुळतीस येऊन विनंति केली की ही गोष्ट कोणालाही सांगूं नये, कारण हें कळल्यास मुलींचें लग्न होणार नाही अशी तिला भीति होती. मुलींचे बाबतींत हा दोष अशा रीतीने झांकणें शक्य असतें. मुलांचे बाबतींत मात्र तो झांकणें असल्यास शीख लोकांप्रमाणें कानांवरून रुमाल बांधावा लागेल. **सं.**

**४**

**स्वास्थ्याचा** डिसेंबरचा अंक नेहमीप्रमाणेंच बारकाअीने वाचला, त्या

वरून पुढील प्रश्न विचारीत आहें. १. ' अश्लीलता...तसा आरोप करणाऱ्यांच्या मनाचा गुण होय, ' असें आपण मानतां, यावरून पावित्र्यही मानण्यावरच अवलंबून आहे आणि आपलें सर्व आयुष्यही मानण्यावरच अवलंबून आहे. तर मग खरें कशाला म्हणावें व त्याची छाननी कशी करावी ? २. खरा बाप कोण हें मुलाच्या आईला सुद्धां अनेक वेळां खरोखर माहीत नसतें. याकरतां बापाच्या नांवाऐवजीं आपल्या नांवापुढें सर्वांनीच आईचें नांव लावण्याची प्रथा पाडली तर बरें नव्हे काय ? ३. यामुळें वेश्यांचीं मुलें आपल्या स्वतःच्या नांवापुढें आईचें नांव लावतात, त्यांतला ( समाजाने मानलेला ) हलकेपणा नाहीसा होईल हेंही बरें नव्हे काय ? ४. यावरून पुढील विचार सुचतो. तुमच्या घरीं अण्णासाहेब कर्व्यांचा फोटो आहे तो तुमच्या खऱ्या बापाचा नसून (व त्याची जरूरीही नसून) तो तुमच्या लौकिकी वडिलांचा आहे–निदान असण्याचा संभव आहे, असेंच ना ? ५. स्वैरसंभोगाला तयार असलेल्या स्त्रियांचीं नांवें, त्यांचे सामान्यतः दर व पत्ते, प्रत्येक शहरांतील वेश्यांची डायरेक्टरी फोटोसह तयार केल्याने बनवतां येईल. आणि त्याचप्रमाणें स्वैरसंभोगाला तयार असलेल्या पुरुषांची यादी वरील स्त्रियांना पुरवतां आली म्हणजे अशा अडलेल्या स्त्रीपुरुषांची मोठीच गरज भागणार आहे. ६. ज्याप्रमाणें ' भाड्याने जागा देणे आहे ' अशा पाट्या रिकाम्या जागांसंबंधाने दृष्टीस पडतात त्याचप्रमाणें वरील स्त्रीपुरुषांनी आपल्या नांवाच्या पाटीवर भेटण्याची वेळ जाहीर केल्यास व त्यावरच ' निरोगी ', 'फक्त परमा असलेली ( ला ),' ' गरमी झालेली(ला),' अशा अर्थाची सर्टिफाइड डिग्री ( सनद ) लावली म्हणजे अनेक प्रश्नांचा उलगडा होईल. ७. तसेंच कलावंतांचे दोन प्रकार–धंदेवाईक आणि हौशी–असे असतात. त्याचप्रमाणे स्वैरसंभोगाला तयार असलेल्यांनी ' धंदा ' अथवा ' हौस ' हेंही पाटीवर नमूद करावें. ८. ' शीलसंवर्धन ' या माझ्या नव्या पुस्तकांत......

आपला **डॉ. के. भा. लेले, पुणें.**

१. ' सत्याची कसोटी ' हा या अंकांतील लेख पहा. आपण अश्लीलतेवरून पावित्र्यावर आणि त्यावरून सर्व आयुष्यावर उड्या मारतां, त्याला कांही

आधार नाही. पावित्र्य हा धार्मिक शब्द आहे, ज्यांना धर्म असेल त्यांनी त्याचा विचार करावा. २. व ३. ही सूचना आम्हीं पूर्वीच केलेली आहे. वास्तविक बापाचें किंवा आईचें नांव लावण्याचें कारणच नाही. केवळ स्वतःचें नांव व आडनांव असेंच नांव लिहिण्यास पुष्कळांनी सुरवातही केली आहे, आणि यूरोप-अमेरिकेंत हीच पद्धत आहे. ४. हा प्रश्न लुच्चेगिरीचा आहे हें पूर्वीच सांगितलें असतांही आपण त्याच लुच्चेगिरीचा प्रयोग माझ्यावर करूं पाहतां, तेव्हां आपणांसही लबाड म्हणण्यास मी कमी करणार नाही. जें तर्कशास्त्र अितरांना लागू आहे तेंच मला लागू आहे, आणि आपणासही लागू आहे. ५. अितक्या वेळां स्पष्ट केलें असतांही स्वैरसंभोगाचा अर्थ आपणांस कळत नाही, तेव्हां आपल्या आकलनशक्तीची कींव येते. स्वैरसंभोग म्हणजे **स्वतःच्या मनाला वाटेल** त्याशीं संभोग. आपण याचा वेश्यावृत्तीशीं घोटाळा करतां आहांत. वेश्यांची डायरेक्टरी तयार केल्यास उपयोग होअील यांत शंका नाही, आपण जरूर करा. स्वैरसंभोगाला दर नसतात आणि अशा स्त्रीपुरुषांची डायरेक्टरीही करतां येणार नाही. ६. आपण चेष्टेने लिहिलें तरी डॉक्टरांकडून तपासून घेऊन सर्टिफिकीट खोलींत लावण्याची मुंबअींतल्या कांही वेश्यांचीं पद्धत आहे. अमुक रोग आहे असें पाटीवर लिहिल्याचा कांहीच उपयोग नाही, हें आपणांस कळायला पाहिजे होतें. आणि मुंबअींत कांही वेश्यांच्या दारावर नांवाच्या पाट्याही दिसूं लागल्या आहेत. निदान वेश्यागृहांच्या मालकिणींच्या नांवाच्या पाट्या दिसतात. ७. हा पुन्हां आपल्या डोक्यांतला घोटाळा आहे. शब्दांचा अर्थ समजण्याची तसदी घ्या. ८. आपल्या पुस्तकाचें परीक्षण याच अंकांत आहे तें पहा. आपला अिंग्रजी कवितांचा संग्रह पाहून अीश्वराला चांगल्याशा कविता करतां येत नाहींत असें दिसतें. **सं.**

---

# शारदेचें पत्र

'युगांतर' मध्यें कोणीतरी 'काळा आदमी' या सहीने अेक लेख लिहिला आहे. सर हरिसिंग गौर हे विलायतेंत एका उपहारगृहांत गेले असतां तेथे त्यांना 'काला आदमी' म्हणून मज्जाव करण्यांत आला होता, यावरून त्यांना तो विषय सुचला आणि त्यांनी चार्चिलला अशी सूचना केली होती कीं त्यांनी क्षणभर चिरूट बाजूला ठेवून या प्रश्नाकडे लक्ष द्यावें. ही सूचना मला जरा चमत्कारिकच वाटते, कारण चार्चिल साहेब हिंदुस्थानचे कट्टे शत्रू आहेत हें आतां जगजाहीर झालें आहे.

हे प्रकार विलायतेंत पूर्वीपासूनच चालत आलेले आहेत, पण अेखाद्या बड्या माणसावर तो प्रसंग आला म्हणजे तें लोकांच्या नजरेला येतें अितकेंच. यांत सारा दोष आहे तो हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचा. हिंदुस्थान देश अिंग्रजांच्या ताब्यांत नव्हता तेव्हां हेच इंग्रज लोक हिंदुस्थानांत व्यापार करण्यास परवानगी मिळावी म्हणून येथे येऊन गुडघे टेकून प्रार्थना करायला तयार होते. सत्तेने मनुष्य मगरूर होतो, कांग्रेसवाले देखील मगरूर होतात, मग अिंग्रजांनीच कां होऊं नये ?

कातडीच्या रंगावरून मनुष्याचा दर्जा ठरवणें हा बावळटपणा तर खराच, पण तो हिंदुस्थानांत नाही आणि विलायतेंतच आहे असें नाही. मुली पाहून लग्न करणारे पुरुष मुलगी काळी आहे अेवढ्यावरूनच पुष्कळ वेळां नाकारीत नाहीत का ? पण त्यांना मी फारसा दोष देत नाही. मुलगी पहायला गेलेला मनुष्य पाहील तरी काय ? कातडीचा रंग ही अेक प्रमुख गोष्ट त्याला दिसते आणि तिला तो महत्त्व देतो यांत नवल काय ? हिंदुस्थानच्या लोकांत देखील रंगाचा भेद पुष्कळ असतो आणि त्यांतल्या त्यांत जे गोरे असतात त्यांना विलायतेंतही विशेष त्रास होत नाही, अशीं अनेक उदाहरणें मला माहीत आहेत. त्यांना होटेलांत देखील मज्जाव होत नाही. पण येथे मात्र अशीं गोरीं माणसें पुष्कळ असतात की तीं

काळ्या माणसांना कमी प्रतीचीं समजतात, आणि तसें उघडपणें बोलून दाखवणारेही अेक गृहस्थ मला भेटले होते.

अितिहासकार राजवाड्यांनी 'राधामाधवविलासचंपू' च्या प्रस्तावनेंत जी माहिती दिली आहे, किंवा जें मत दिलें आहे, की "१. प्रथम ब्राह्मण ऊर्फ ब्रह्मन् हा अेकच शुक्लभास्वरवर्णी वर्ण होता. २. त्याला रक्तलोहितवर्णी क्षत्र ऊर्फ क्षत्रिय लोक भेटून ब्रम्हक्षत्र नामक द्वैवर्ण्य बनलें. ३. पुढें पीतवर्ण विश लोक समावून त्रैवर्ण्य उत्पन्न झालें. ४. शेवटीं उत्तर कुरूंत व उत्तरमद्रांत कृष्णवर्ण शूद्रांचा समावेश होऊन जगत्प्रसिद्ध चातुर्वर्ण्य निर्माण झालें. ५. मूळ अेकाच शुक्लभास्करवर्णी लोकांचे तांबडे, पिंवळे व काळे असे भिन्न वर्ण होणें अशक्य आहे." तेव्हां फक्त गोरीं माणसें तेवढीं शुद्ध रक्ताचीं आणि बाकीच्यांत कांहीतरी सांवळा गोंधळ असला पाहिजे, अशा कल्पनेवरून देखील हा उच्चनीचभाव आला असणें शक्य आहे. पण ही माहिती सर्वांनाच नसते, आणि हल्ली जो गोरेपणाचा अभिमान दिसतो तो केवळ गोरा रंग चांगला दिसतो अेवढ्यावरच आधारलेला असला पाहिजे.

लग्नाकरतां वधूची किंवा वराची निवड करतांना रंगाकडे लक्ष जाणें साहजिक आहे, पण तें उघडपणें कबूल करायला पुष्कळांना लाज वाटते. माझ्या माहितीचे अेक मध्यम वयाचे गृहस्थ दुसऱ्या लग्नाचा विचार करीत असतांना ओळखीच्या कांही मुलींविषयीं चर्चा चालली होती. त्यांपैकीं अेक काळी आणि अविवाहित आणि दुसरी गोरी आणि विधवा होती. ते गृहस्थ म्हणाले 'मला विधवा देखील चालेल, पण ती गोरी असावी.' यावर कोणी चेष्टा करील अशी त्यांना भीति वाटली असावी. कारण ते लगेच पुढें म्हणाले, 'म्हणजे तसें कांही नाही, पण मुलें काळीं झालीं तर आपल्याला नाही बुवा आवडणार!' मला हसूं आलें. ही सबब कां? बायकोच गोरी पाहिजे असें म्हणायला लाज कां वाटावी? त्या विधवेने त्यांचें अैकलें नाही आणि शेवटीं त्या गृहस्थांचा लग्नाचा बेत तसाच राहून गेला, कारण त्यांच्या मनाप्रमाणें बायको त्यांना मिळाली नाही.

# शारदेचें पत्र

तुमच्या पुण्यांतल्या ज्या अडाणी लोकांनी संस्कृतिसंरक्षक का कसलसं मंडळ काढलें आहे, त्यांना स्वतःलाच आर्यसंस्कृति म्हणजे काय याची कल्पना नाही असें दिसतें. कारण त्यांनी आर्यसंस्कृति या शब्दाचा अर्थ ठरवण्याकरतां अेक वेगळें मंडळ नेमलें आहे. यांना जर आर्यसंस्कृति म्हणजे काय हें माहीत नाही, तर हे संरक्षण कशाचें करतात ? खिस्ती संस्कृतीचें ? बरी त्यांना आपल्या अज्ञानाची लवकरच जाणीव झाली ! अर्थातच ते कदाचित् असेंही म्हणतील की आम्हाला तर आर्यसंस्कृतीचा अर्थ माहीत आहेच, पण जनतेला त्याची कल्पना नाही, तेव्हां हें मंडळ ' त्याची निश्चित कल्पना जनतेला करून देण्यासाठी व तदनुरोधाने हल्लीच्या परिस्थितींत कसें आचरण करावें याचा विचार करण्यासाठीं ' नेमलें आहे. त्यांचे शब्द असे आहेत, पण त्यांचा अर्थ असाच होतो कीं आर्यसंस्कृति म्हणजे काय हें त्यांनाच माहीत नाही आणि ते स्वतः देखील हल्लीं त्याप्रमाणें आचरण करीत नाहीत. अेरवीं या मंडळाची काय जरूर होती ? या मंडळांत अर्थातच तुमच्या पुण्यांतले सुप्रसिद्ध विद्वान गो. म. जोशी आहेतच ! शिवाय अश्लीलतासंशोधक मराठे आहेत, भाटे आहेत, श्री. नी. चाफेकर आहेत, आणि ज. स. करंदीकर तर असायचेच. यांत वामनराव जोशी कसे घेतले नाहीत याचेंच आश्चर्य वाटतें. वामनरावांना संस्कृति कळत नाही, किंवा ते तीप्रमाणें वागत नाहीत, असा याचा अर्थ दिसतो. बाकीचे तरी कोठे वागत आहेत म्हणा ! या मंडळाच्या संमेलनांत जे ठराव झाले, त्यांवरून आतां संस्कृतीची व्याख्या कशी होणार याची थोडीबहुत कल्पना येते. लकडीपूल विठोबाचे देवळासमोरचा गणपति बूटसुटांत असे, तसा यंदा नव्हता याबद्दल चालकांचें अभिनंदन केलें आहे. यावरून बूटसूट घातलेला आर्यसंस्कृतीला चालत नाही असें दिसतें. दुसऱ्या अेका ठरावांत कॅरम खेळणारा गणपति न दाखवल्याबद्दल अभिनंदन आहे. तेव्हां कॅरम हा खेळ आर्यसंस्कृतीला बाधक आहे हें उघड आहे. सामान्यतः माणसें जे खेळ खेळतात तेच देव खेळतात. देव सोंगट्या खेळल्याचीं वर्णनें आहेत. पुराणें लिहिलीं त्या वेळीं कॅरमचा खेळ माहीत नव्हता, अेरवीं ते कदा-

चित कॅरम देखील खेळले असते. पण या आर्यसंस्कृतिवाल्यांना अेवढी अक्कल कोठली? किंवा कदाचित् अक्कल असली तरी ती वापरायची नाही असा देखील नियम आर्यसंस्कृतींत असेल. कोणीं सांगावें?

हें संमेलन अर्थातच अग्निहोत्रमंदिरांत झालें आणि यानंतर त्याच ठिकाणीं 'साहित्यसंगीतकलापरिषद' झाली. तिला गो. म. जोशांपेक्षां लायक अध्यक्ष कोण मिळणार? यांतलेही कांही ठराव नमुनेदार आहेत. दक्षिण महाराष्ट्र साहित्य-पुरस्कारसमितीने 'रणांगण' कादंबरीला बक्षिस दिलें, तें या लोकांना पसंत नाही. हो, ते परीक्षक कांही झालें तरी गो. म. जोशांच्या अितके विद्वान कसे असणार, आणि त्यांना आर्यसंस्कृति म्हणजे काय हें तरी कसें कळणार?

आणखी अेका ठरावांत ते सगळ्या युनिव्हर्सिट्यांचें नियंत्रण करूं पाहतात, कारण त्यांत कोणती युनिव्हर्सिटी तें सांगितलेलें नाही. जगांत कोठेही मॅट्रिक-पासून अेम. अे. पर्यंत अभ्यासाकरितां जीं पुस्तकें नेमलीं जातात, त्यांत धर्म-विरोधी किंवा संस्कृतिविरोधी जो भाग येत असेल तो विश्वविद्यालयाच्या पुस्तक-समितीपुढे ठेवण्याकरतां त्यांनी अेक मंडळ नेमलें आहे. संस्कृति कोणती हें या ठरावांतही सांगितलेलें नाही. की सर्व जगभर संस्कृति शब्दाचा अर्थ अेकच असतो अशी या लोकांची कल्पना आहे? शिवाय या पुस्तकसमित्या स्वतः पुस्तकें वाचल्याशिवाय तीं अभ्यासाकरतां नेमतात, असा सरळ आरोप या ठरावांत केलेला आहे. या शिष्टांच्या मताप्रमाणें चाललें तर कालिदास किंवा शेक्सपिअर-सारखे कवि परीक्षांना नेमतां येणार नाहीत, किंवा त्यांत निदान कापाकापी करावी लागेल. या उंटावरच्या शहाण्यांना जर पुस्तकसमित्या भीक घालूं लागल्या तर शिक्षणाचें वाटोळें होणार. मराठ्यांनीं सगळीं अश्लील पुस्तकें वाचून घेतलेलीं आहेत, तीं तरुणांना वाचायला मिळूं नयेत असें त्यांना आतां म्हातारपणीं वाटूं लागलें आहे. असल्या म्हाताऱ्यांना तरुणांबद्दल प्रत्येक बाबतींत हेवा वाटत असतो. त्यांच्या स्वतःच्या अंगांत कांही त्राण राहिलेलें नसतें, तेव्हा तरुणांनीही म्हाताऱ्यांप्रमाणेंच वागावें अशी त्यांची अिच्छा असते. पण तरुण माणसें काय असल्या अिच्छेला भीक घालणार आहेत? पुस्तकसमित्यांतल्या म्हाताऱ्यांनी जरी

या लोकांना पाठिंबा दिला, तरी त्यांनी बंद केलेली पुस्तकेंच तरुण नेमकीं वाचतील हें काय सांगायला पाहिजे ?

परवां रांगणेकरांचें 'आशीर्वाद' नाटक पाहिलें. त्यांतला नटनटींचा संच चांगलाच आहे, पण जहागिरदारांसारखा बोलपटांत नांवाजलेला नट आणि दिग्दर्शक रंगभूमीवर अगदीच फिका पडला. त्यांनी प्रथम प्रवेश केला तो अगदी झक्क पांढरा पोषाख घालून. तो अतिशय किंमतीचा होता असें मी ऐकलें, पण त्या रंगभूमीवर तो रंगसंगतीच्या दृष्टीनें फारच भयंकर दिसत होता. या गोष्टी जर दिग्दर्शकांना कळल्या नाहीत, तर कोणाला कळायच्या ? आणि रंगभूमीच्या सजावटीबद्दल आणि प्रकाशाच्या व्यवस्थेसंबंधी रांगणेकरांनी विशेष परिश्रम केल्याची जी जाहिरात अगोदरपासून केली होती, तसें तर कांहीच दिसलें नाही. कांही प्रसंगीं रंगभूमीवरच्या देखाव्याच्या मागच्या बाजूला उजेड टाकला होता, अितकेंच मला त्यांत नवीन दिसलें. त्यांनी नाटकांत जो प्रश्न सोडवण्याचा आव आणला आहे, तो तर मुळीच सुटलेला नाही. मुलगा नसल्यामुळे बाप मुलीलाच मुलगा समजून शिक्षण देतो आणि ती डाक्तरीण झाल्यावर लग्न करून निघून न जातां तिने घरींच राहून आपल्याला हातभार लावावा अशी त्याची अिच्छा असते. लग्न करूनहि मी तुम्हाला मदत करीन असें तिने सांगितलेलें त्याला पटत नाही, कारण लग्न केल्यावर ती दुसऱ्याची होणार, तेव्हा तिच्याकडून पैसा घ्यायला तो कबूल नसतो. आणि शेवटीं हा प्रश्न सोडवला तो कसा ? तर तिने लग्न करून नवऱ्यासकट बापाच्याच घरीं रहावें, आणि धंदा करून बापाचा संसार चालवावा. जणूं काय तिचा नवरा तेथेंच राहिला म्हणजे ती दुसऱ्याची होत नाही ! सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे ही कंपनी आधाशीपणा करून मरणार अशी मला भीति वाटते. बोलपटाच्याच लांबीच्या नाटकाला त्यांनी पहिला दर पांच रुपये दहा आणे ठेवावा हें मला गरीबीमुळे पटत नाही हें तर खरेंच, पण मला वाटतें त्यांचेंही त्यांत हित होणार नाही. नाटककंपन्या मेल्या, याला सिनेमा हें अेक कारण निःसंशय आहे, आणि सिनेमा नाटकापेक्षा किती स्वस्त आहे हें जर हे

लोक अशा रीतीनें सप्रमाण सिद्ध करून दाखवणार असतील तर त्यांचें मरण लांब नाही. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे हीं नाटकें चालू असतांनाच अेका हिजड्यांच्या कंपनीने आपल्या जाहिराती फडकवल्या आहेत, आणि त्यांनीही यांच्यासारखेच भरमसाट दर लावले आहेत. त्यांचीं नाटकें अधिक लांब आहेत हें त्यांचें अेक कारण असेल, आणि कदाचित् हिजड्यांचीं नाटकें देखील मुंबअींतल्या कांही निर्बुद्ध श्रीमंतांना आवडत असतील. आश्चर्य वाटतें तें हें कीं लोकांना सिनेमांत नटी पाहण्याची संवय झालेली असतांना देखील या कंपन्यांना अजून नटींची जरूरी भासत नाही. अशा निर्बुद्ध लोकांच्या कंपन्या बुडाल्या तर मला मुळीच वाअीट वाटणार नाही, नव्हे त्या बुडाव्या असेंच मला वाटतें.

तुझी शारदा.

---

# खेडेगांवांत पाण्याची सोय

( फ्रेंचवरून )

पाण्याचें महत्व कोणाला सांगायचें कारण नाही. खेडेगांवांत शेतकीला पाणी लागतें, माणसांना आणि जनावरांना प्यायला पाणी लागतें, अन्न शिजवायला पाणी लागतें, आणि शरीराच्या, कपड्यांच्या आणि घरांच्या स्वच्छतेकरतां पाणी लागतें. अितकेंच नव्हे तर अेखादे वेळीं आग लागली तर ती विझवायला देखील पाणी लागतें. सारांश खेडेगांवांत पाणी विपुल असल्याशिवाय तेथील जीवन असह्य होअील.

सामान्यतः प्रत्येक मनुष्याला ५० ते ६० लीत्र (लीत्र=३५ औंस), घोडा, बैल, गाय, वगैरेंना प्रत्येकीं ५० लीत्र, वांसरें, डुक्कर, वगैरेंना ८ ते २० लीत्र, आणि मेंढरांसारख्या लहान जनावरांना प्रत्येकीं ५ लीत्र, पाणी मिळणें अिष्ट असतें.

# खेडेगावांत पाण्याची सोय

पाणी उन्हाळ्यांत गरम आणि हिंवाळ्यांत थंड वाटूं नये म्हणून त्याची उष्णता सुमारें ७° ते ११° सेंटिग्रेड ितकी असावी, ( म्हणजे आपल्या तापनळीवरचे सुमारें ४६° ते ५२° ). तें ५° पेक्षां थंड असल्यास प्यायला फार गार लागेल, ितकेंच नव्हे तर मनुष्याच्या आणि जनावरांच्याहि पोटाच्या अंतस्त्वचेला त्रास होिल, आणि १५° पेक्षा गरम असल्यास त्याने तहान भागणार नाही, आणि तें प्यायला वाीट लागेल.

प्यायचें पाणी नेहमीं स्वच्छ दिसलें पाहिजे, म्हणजे त्याला कोणताही रंग असतां नये. तें किंचित् पिंवळसर दिसल्यास तें खराब असण्याचा संभव आहे, कारण खोल जमिनींतून आलेलें पाणी नेहमीं स्वच्छ असतें आणि त्यांत कांही घाण असण्याचा संभव कमी असतो. पाणी कांचेचे भांड्यांतून प्याल्यासच तें तितकें स्वच्छ आहे की नाही हें कळतें. पितळेच्या किंवा चांदीच्या भांड्यांत देखील पाणी किंचित् पिंवळसर असल्यास कळणार नाही.

तसेंच पाण्याला कोणतीही चव किंवा वास असतां नये. त्यांत किंचित् मीठ विरलेलें असणें शक्य आहे व तें अत्यंत लहान प्रमाणांत असल्यास चालेल, परंतु समुद्रकांठच्या गांवांत देखील हें प्रमाण वीस हजारांत एक भागापेक्षा जास्त असूं नये. तें जास्त असल्यास त्यांत कांही तरी घाण ( मूत्र वगैरे ) गेली असल्याचा संशय येण्यास जागा आहे. तसें असल्यास त्यांत अमोनिया वगैरे कांही ितर पदार्थहि सांपडतील. मिठाचें प्रमाण पांचहजारांत एक भागापेक्षा जास्त असल्यास पाणी तापवण्याचीं भांडीं स्वच्छ रहात नाहीत, त्यांवर मिठाचा थर बसतो. आणि हें हजारांत एकापेक्षा जास्त असल्यास पाणी पिण्यास निरुपयोगी होतें, आणि झाडांच्या वाढीलाही त्याचा उपयोग होत नाही.

पाण्यांत कॅलसिअम किंवा मॅग्नीसिअमचे क्षारही फारसे असतां नये, कारण अशा पाण्यांत अन्न चांगलें शिजत नाही, आणि कपडा धुण्यास साबण फार लागतो. त्यांत लोह किंवा मॅंगनीजचे क्षारही असूं नये आणि कारबॉनिक किंवा हायड्रोसल्फ्यूरिक ॲसिद देखील असूं नये. तथापि पाण्यांत खनिज द्रव्यें मुळीच नसणेंहि बरें नव्हे, कारण अशा पाण्याने कालवे वगैरेंचें बांधकाम लवकर

खराब होतें, आणि अशा पाण्याचा शिशाशीं संबंध आल्यास तें पाणी प्याल्याने शिसें पोटांत जातें, व तें भयंकर विषारी आहे. अशा वेळीं पाणी खडूच्या तुकड्यांतून किंवा कॅल्सिअम असलेल्या अितर प्रकारच्या दगडांतून जाऊं दिल्यास तें पिण्यालायक होतें.

अर्थात् पिण्याच्या पाण्यांत कोणताही रोगजंतु असतां नये हें उघडच आहे. हे जंतु म्हणजे विशेषतः टायफॉअिड, पटकी वगैरे आंतड्यांच्या रोगांचे असतात. शिवाय ' बॅक्टीरिअम कॉली ' नांवाचा अेक जंतु मनुष्याच्या आंतड्यांत नेहमीं सांपडतो. हा जंतु म्हणजे रोगाचें चिन्ह समजतां येत नाही, तरीपण तो पिण्याच्या पाण्यांत सांपडल्यास त्याचा अर्थ असा होतो की पाण्याला मलाचा संसर्ग झालेला आहे, तेव्हा हा जंतुहि पाण्यांत सांपडतां नये, कारण तो सांपडल्यास त्याबरोबरच रोगजंतुहि सांपडण्याचा संभव असतो.

खेडेगांवांना पाणी पुष्कळ वेळां जमिनींतून निघणाऱ्या झऱ्यांपासून मिळतें आणि गांवें बहुधा अशा झऱ्यांच्या ठिकाणींच वसतात किंवा अर्थात् नदीकांठीहि वसतात. परंतु असें पाणी प्रारंभीं कितीहि स्वच्छ असलें तरी मनुष्याच्या सांनिध्याने तें तावडतोब खराब होतें, कारण मनुष्याच्या व अितर प्राण्यांच्या मलमूत्राशीं त्याचा संबंध येतो. तेव्हा अशा झऱ्याचें पाणी या घाणीपासून सुरक्षित राहील अशी व्यवस्था करणें जरूर असतें. म्हणजे मनुष्याने वापरलेलें पाणी झऱ्यांतून येणाऱ्या पाण्याला जाऊन मिळणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे. झऱ्याचें पाणी जेथें सांठत असेल त्या सांठ्यावर अेखादें झांकण असलें पाहिजे हें यावरून उघड होतें, परंतु अेवढ्यानेच भागत नाही. वापरलेलें पाणी त्यापासून दूर वाहून जावें याकरतां गटारें वगैरे मार्ग तयार केले पाहिजेत. यापेक्षाही चांगला मार्ग म्हणजे जेथे झरा जमिनींतून बाहेर निघत असेल त्याच्या वरच्या बाजूला खणून आणि कांही बांधकाम करून त्याशीं अितर कोणत्याहि पाण्याचा संबंध येणार नाही अशी व्यवस्था केली पाहिजे, आणि पाण्याच्या सांठ्याच्या आसपासची बरीच जागा सर्व प्रकारच्या घाणीपासून सुरक्षित ठेवली पाहिजे. ही जागा किती असावी हें जमीन कशी आहे यावर अवलंबेल. हें

अेकदां ठरवलें म्हणजे तेवढ्या जागेभोंवती कुंपण घालून त्याच्या आंत माणसांना किंवा जनावरांना जाऊं देतां नये.

हें पाणी अशा रीतीनें सांठवल्यावर तें घरांना पुरवण्याची व्यवस्था केली पाहिजे. घरापेक्षा सांठा जेव्हा अधिक उंचीवर असेल तेव्हा तेथून घरापर्यंत नळ आणला म्हणजे काम झालें, परंतु तो उंचीवर नसल्यास यंत्राने पाणी वर चढवावें लागेल. कांही असलें तरी या नळाचे सांधे उत्तम असले पाहिजेत, नपेक्षा त्यांतून पाणी बाहेर जाण्याचें भय व त्याहीपेक्षा बाहेरून कांही घाण पाण्यांत जाण्याची भीति राहील. हे नळ पुष्कळ वेळां शिशाचे केलेले असतात, कारण शिसें सहज वांकवतां येतें, परंतु कांही प्रकारचे पाण्यांत शिसें विरतें आणि त्यापासून धोका आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. परंतु वापरलेलें पाणी काढून टाकण्याकरतां जसे चिनी मातीचे नळ वापरतात, तसलेच नळ पिण्याचें पाणी आणण्यासहि वापरण्यास हरकत नाही. ते महाग नसतात, परंतु ते वांकत नसल्यामुळे त्यांत सांधे फार येतात ही अेक गैरसोय आहे.

अेखादेंच घर बऱ्याच अंतरावर असल्यास, किंवा खेडेगांवांत फारच थोडीं घरें असल्यास, तेथें नळाची सोय करणें शक्य होणार नाही. अशा वेळीं विहिरीच्या पाण्यावरच भिस्त ठेवावी लागते. असें असेल तर विहिरीच्या आसपास कोणतीहि घाण असणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. विहिरीपासून सुमारें १०० हातांचें आंत कोठेही माणसांचें किंवा जनावरांचें मलमूत्र येऊं शकणार नाही अशी व्यवस्था असावी. शिवाय विहिरीचा जवळचा भाग कॉंक्रीटने बांधून काढून तो विहिरीपासून उतरता असावा, म्हणजे पावसाचे वेळीं देखील विहिरींत बाहेरून घाण जाण्याचा संभव राहणार नाही. पुष्कळ वेळां जनावरांना पाणी पाजण्याकरतां विहिरीशेजारींच पाण्याचा सांठा केलेला असतो, किंवा विहिरीच्या कांठाशींच लोक कपडेहि धुतात. यांत अत्यंत धोका आहे, कारण अशाने जनावरांचें मलमूत्र आणि कपडे धुतलेलें पाणी विहिरीचे कांठाशीं कायमचें सांठून राहण्याचा संभव असतो आणि ही घाण विहिरींतहि झिरपून जाणें शक्य असतें.

विहीर नदीचे शेजारीं असल्यास नदीचें पाणी विहिरींत झिरपून जाणार,

तेव्हा तें गाळून यावें म्हणून विहीर नदीपासून सुमारें साठ फुटांचे आंत असूं नये. अर्थात् पाणी झिरपणें शक्य नाही अशा प्रकारची जमीन असल्यास विहीर जास्त जवळ असलेली चालेल. विहिरीची खोली ठरवणें कठिण आहे, परंतु खालीं खडक किंवा निदान चिकट माती लागेपर्यंत ती खोदणें जरूर आहे, आणि त्याहीपेक्षा थोडें अधिक खोल गेल्यास बरें. विहिरींत पाणी झिरपून जाण्याचा संभव असल्यास विहिरीचा कांही भाग बांधून काढावा लागेल आणि ती वर-पर्यंत बांधावी लागल्यास बांधकाम जमिनीच्या वर बरेंच आलें पाहिजे, अरवीं बाहेरचें पाणी आंत वाहून जाईल.

पाणी काढण्याकरितां पुष्कळ वेळां बालदी वापरतात आणि ती बाहेर काढल्यावर कोठेतरी पडलेली असते, यामुळे ती पाण्यांत घालतांना आंत घाण जाण्याचा संभव असतो. बालदीच्या अैवजीं पंप लावणें नेहमी चांगलें. हें थोडें खर्चाचें काम असतें, परंतु खेडेगांवांना वीज पुरवण्याची व्यवस्था झाल्यास विजेने आपोआप चालणारे पंप लावतां येवून पुष्कळांची सोय होअील. असें झाल्यास विहीर उघडी ठेवण्याचें कारणच राहणार नाही, आणि ती पक्की बंद केल्यास पाणी सुरक्षित राहून खेड्याच्या आरोग्याला अतिशय मदत होअील.

कधीकधी खराब झालेल्या पाण्याची विहीर पुनः वापरांत आणावी लागते. अशा वेळीं प्रथम तींतील सर्व पाणी आणि खालचा गाळ साफ काढून टाकून नंतर आंत पाणी येऊं दिलें पाहिजे, आणि असें अनेक वेळां केलें तरच पाणी स्वच्छ होईल. तें जंतुविरहित करणें असल्यास त्यांत शेंकडा ६० ते ८० प्रमाणाचें चुन्याचें पाणी टाकतात आणि तें कांहीं दिवस राहूं देऊन नंतर पंपाने काढून टाकतात.

कित्येक ठिकाणीं जमिनींत पाणीच लागत नाही. अशा वेळीं घरांवर पडलेले पावसाचें पाणी टाकींत सांठवण्याची व्यवस्था करावी लागते. अशाने पुरेसें पाणी मिळेल की नाही हें माणसांच्या संख्येवर अवलंबेल. पॅरिस शहरांत अशा रीतीने पाणी जमवल्यास सर्वांना पुरेसें पाणी मिळणार नाही हें उघड आहे,

परंतु जेथे माणसांच्या मानाने घरांच्या छपरांचें क्षेत्रफळ बरेंच असेल, तेथे अशा रीतीने पुरेसें पाणी मिळूं शकेल. (आफ्रिकेंत कित्येक ठिकाणीं अशा रीतीनें पुरेसें पाणी जमवावें लागतें. **संपादक**). हें पाणी सांठवण्याकरतां जो हौद बांधायचा, त्याचा कांहीं भाग जमिनींत गेलेला असल्यास पाणी गार राहील, परंतु तो फार खोल गेल्यास पाण्याच्या दाबाने बांधकामाला धोका उत्पन्न होईल. तेव्हा सामान्यतः जमिनीच्या खालीं सुमारें ८-९ फूट आणि वर ५ ते १२ फूट असा हौद बांधतात आणि या वरच्या भागाभोंवतीं खोदून काढलेली माती घालतात. अर्थात् हा हौद झांकलेला असतो आणि त्यांतून पंपाने किंवा साध्या तोटीनें पाणी काढून घेतात.

या पद्धतींत अेक गैरसोय अशी आहे की घराच्या छपरावर अनेक प्रकारचे जंतु असणें शक्य असतें आणि यामुळे पाणी चांगलें रहात नाही. त्यांत निदान रोगजंतु तरी जाणार नाहीत अितकी खबरदारी घेणें जरूर असतें (सर्वच जंतु रोगजंतु नसतात. **संपादक**). असा हौद संडासांपसून लांब असला पाहिजे, आणि त्यांत कोठूनहि वापरलेलें पाणी जाऊं शकणार नाही अशी व्यवस्था केली पाहिजे. अर्थात् घरांचीं छपरें स्वच्छ राखलीं पाहिजेत, विशेषतः त्यांवर कबुतरें किंवा अितर पक्षी बसून घाण करणार नाहीत अशी व्यवस्था केली पाहिजे. प्रथमच्या पावसाबरोवर छपरावरची सगळी घाण धुवून जाते, तेव्हां हें पहिलें पाणी हौदांत घेतां नये, किंवा तशी व्यवस्था न केल्यास हौदांत जाणारें पाणी कोळसा, वाळू वगैरेच्या फिल्टरमधून गाळून जाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

हौद मधून मधून साफ केला पाहिजे, आणि विशेषतः पाण्याला किंचित् वास येऊं लागल्यास तो साफ करणें भाग आहे, कारण हा वास आंत कांही वनस्पतींची वाढ होऊन नंतर त्या कुजल्यामुळे येतो. अशा वेळीं हौदांत जितकें पाणी असेल, त्याच्या अेक दशलक्षांश भाग मोरचूत त्यांत टाकल्यास काम होअील.

---